१०३ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• पुणे, गुरुवार १४ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-४, अंक-३२८, पाने-८, किंमत : ₹ ६
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 4, Issue - 328, Marathi - Daily - Pune, 14 August, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## सार्वजनिक बँकांकडून ५ वर्षांत ५.८२ लाख कोटींचे कर्ज माफ



**नवी दिल्ली** - देशातील सार्वजनिक बँकांनी गेल्या पाच वर्षांत ५.८२ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी काल राज्यसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली. आपल्या उत्तरात ते म्हणाले की, २०२०-२१ या आर्थिक वर्षात सर्वाधिक १.३३ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले. त्याच्या नंतरच्या वर्षी १.१६ लाख कोटी तर २०२२-२३ या आर्थिक वर्षात १.२७ लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले. २०२४-२५ या आर्थिक वर्षात ९१ हजार २६० कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले आहे. थकीत कर्ज रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनानुसार व बँकांच्या संचालक मंडळाच्या परवानगीने माफ करण्यात आले आहे. हे कर्ज माफ करण्यात आले असले तरी त्याचा कर्जदाराला फायदा होणार नसून त्यांच्यावर वसुलीची कारवाई करण्यातच येणार आहे. माफ केलेल्या कर्जाची जबाबदारीही कर्जदारावरच राहील.

## निवडणूक आयोगाला चपराक कोर्टाने सर्व ईव्हीएम तपासले

**इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनवर (ईव्हीएम) गैरप्रकाराचा आरोप करून रान उठवणाऱ्या विरोधी पक्षांना दिलासा वाटेल असा निर्णय सर्वोच्च न्यायालयात नुकताच दिला आहे. कोर्टाच्या आदेशावरून सर्व ईव्हीएम मशीनची पुन्हा मतमोजणी करण्यात आली आणि त्यात तक्रारदाराची तक्रार सत्य निघाली.**


■ नवी दिल्ली



**सरपंचपदाच्या** निवडणुकीत मतमोजणीत गैरप्रकार झाल्याचा आरोप झाला. यावर निर्णय देताना सुप्रीम कोर्टाने सर्व ईव्हीएम ताब्यात घेऊन फेरमतमोजणी करायला लावली आणि फेरमतदानाच्या निकालावरून निवडणूक अधिकाऱ्याने दिलेला निकाल बदलला आहे. ही निवडणूक आयोगाला बसलेली सणसणीत चपराक आहे. ईव्हीएम यंत्रांमध्ये फेरफार करणे शक्य आहे आणि निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या सांगण्यावरून असे फेरफार करत आहे, असा आरोप सातत्याने करणाऱ्या काँग्रेससह तमाम विरोधी पक्षांच्या म्हणण्याला बळ देणारी ही घटना हरियाणातील आहे. हरियाणाच्या बौना लखू गावाच्या सरपंचपदाची निवडणूक २ नोव्हेंबर २०२२ मध्ये झाली. मतमोजणीनंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी कुलदीप सिंग या उमेदवाराला विजयी घोषित केले. पराभूत उमेदवार मोहित कुमार यांनी या निकालाला स्थानिक न्यायालयात आव्हान दिले. पानिपतच्या अतिरिक्त शहर न्यायाधीशांसमोर हा खटला चालला. न्यायालयाने २२ एप्रिल २०२५ रोजी याचिकाकर्त्याच्या संशयाचे निराकरण करण्यासाठी सर्व मशीनची फेर » पान ७ वर

# मराठी आंदोलकांची धरपकड! जैनांना सूट
# मात्र कोर्टाचा निर्णय कायम! कबुतरांना खाणे नको

**आज दादर कबुतरखाना बंदीच्या समर्थनार्थ मराठी एकीकरण समितीने आंदोलन केले. जैन मुनी निलेशचंद्र विजय यांच्या 'शस्त्र उचलू' या वक्तव्याला प्रत्युत्तर देण्यासाठी हे आंदोलन समितीने पुकारले होते. दादर पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारली होती आणि समितीला आधीच नोटीस बजावली होती. तरीही साडेअकरा वाजताच्या सुमारास आंदोलक जमा झाले. परंतु तिथे मोठा फौजफाटा तैनात केला होता. पोलिसांनी कार्यकर्त्यांची तातडीने धरपकड केली आणि त्यांना पोलीस गाडीत कोंबत दूर नेले. यामुळे आंदोलक भडकले होते. जैन लोक इथे जमले, त्यांनी ताडपत्री फाडली, कबुतरांना पोती पोती ओतून खायला घालत कायदा मोडला तेव्हा पोलीस बघत राहिले. एकावरही गुन्हा दाखल केला नाही. मात्र मराठी माणसांना लगेच पकडले, असा संताप व्यक्त केला. दरम्यान, दुपारी मुंबई उच्च न्यायालयाने कबुतरखाना बंदी निर्णय कायम ठेवला.**



■ मुंबई

**आज** दुपारी तीन वाजताच्या सुमारास याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने कबुतरखान्यावरील बंदी कायम ठेऊन लोकभावना विचारात घेऊन निर्णय घेण्याच्या सूचना दिल्या. याप्रकरणाची पुढील सुनावणी चार आठवड्यांनंतर होणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

राज्याचे महाअधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी सरकारची भूमिका मांडली. त्यांनी सार्वजनिक आरोग्याला धोका न पोहोचवता नियोजित जागी पक्षांना सकाळी ६ ते ८ पालिकेतर्फे खाद्य देण्यात येईल, असे सांगितले. त्यावर आमच्यासाठी सार्वजनिक आरोग्य महत्त्वाचे असल्याचे न्यायालयाने सांगितले. यावेळी काही वकिलांनी महालक्ष्मी रेसकोर्स येथे कबुतरांना अन्न देण्याची मागणी केली. त्यावर न्यायालयाने सवाल केला की, तुम्ही यानंतर आझाद मैदानाचीही मागणी करणार का? मैदान कोणाच्या मालकीचे आहे? न्यायालयाने निर्देश दिले की, २० ऑगस्टपर्यंत पालिकेने यावर समिती नेमावी. एक महिन्यात समितीचा अहवाल सादर करावा. तज्ज्ञ समिती पालिकेकडे अहवाल देईल त्यावर नागरिकांच्या हरकती आणि सूचना मागवा. लोकांची भूमिका विचारात घेऊन निर्णय घ्या. सार्वजनिक नोटीस जारी करून नागरिकांची मते जाणून घ्या. लोकांची मते जाणून घेतल्याशिवाय एकतर्फी निर्णय नको. तुमच्या मनाऐवजी लोकांच्या मागणीचा विचार करा. कायद्याने जेवढा वेळ लागेल तितका लागू द्या. परंतु लोकांचे म्हणणे महत्त्वाचे आहे. आमच्यासाठी लोकांचे आरोग्य महत्त्वाचे आहे.

पालिकेच्या वकिलांनी सांगितले की, पालिकेने कबुतरखान्याबाबत कोणतीही भूमिका अद्याप बदललेली नाही. युक्तिवादात सर्व पक्ष सामंजस्याच्या भूमिकेत होते. यापूर्वीच्या सुनावणीत न्यायालयाने समिती नेमण्याचे निर्देश दिले होते. या समितीत आरोग्य अधिकारी, टाऊन प्लॅनिंग संबंधित अधिकारी, इम्युनोलॉजिस्ट आणि मायक्रोबायोलॉजिस्ट, केंद्र व राज्य पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यांचा समावेश असणार आहे.

आज सकाळी कबुतरखाना परिसरात मराठी एकीकरण समितीचे अध्यक्ष गोवर्धन देशमुख आणि त्यांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने दाखल झाल्यानंतर त्यांना पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेतले. या झटापटीत देशमुख यांच्या हाताला दुखापत झाली. पोलिसांनी रक्त काढल्याचा आरोप देशमुख यांनी केला. गोवर्धन देशमुख म्हणाले की, आमचे दुर्दैव आहे की, आमच्यासोबत मंगलप्रभात लोढा यांच्यासारखा एकही मंत्री नाही. २८८ आमदार आणि ७८ मंत्र्यांपैकी कोणीही आमच्या बाजूने उभे राहत नाही. मराठी भूमीत कायद्याचे उल्लंघन करून, पोलिसांवर हल्ला, ताडपत्री फाडणे, बांबू तोडणे हे सर्व » पान ७ वर

## नितीश कटारा हत्याकांडातील दोषीची सुटका! आई नाराज

**ही तर न्यायाची क्रूर थट्टा**

■ नवी दिल्ली

**वीस** वर्षांपूर्वीच्या नितीश कटारा हत्याकांडातील एका जन्मठेप झालेल्या दोषीची तुरुंगातून मुक्तता करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. यामुळे या प्रकरणात न्यायासाठी मोठा लढा दिलेल्या नितीश कटाराची आई नीलम कटारा यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ही तर न्यायाची क्रूर थट्टा आहे, अशा शब्दांत नीलम कटारा यांनी निकालावर जळजळीत प्रतिक्रिया दिली.

सन २००२ मध्ये २३ वर्षीय नितीश कटारा याचे अपहरण करून त्याची हत्या करण्यात आली होती. नितीशचे भारती यादव नावाच्या



तरुणीशी प्रेमसंबंध होते. भारती ही बिहारचा माजी राज्यसभा सदस्य डी. पी. यादव यांची मुलगी आहे. या प्रेमसंबंधांना भारतीच्या कुटुंबियांचा विरोध होता. त्यातून नितीशचे अपहरण करून त्याची हत्या करण्यात आली. या खटल्यात भारतीचा भाऊ विकास यादव, चुलत भाऊ विशाल यादव आणि सुखदेव यादव यांचा समावेश होता. सन २०१६ मध्ये म्हणजे तब्बल चौदा वर्षांनी या खटल्याचा निकाल लागला. न्यायालयाने विकास आणि विशाल यादव यांना २५ वर्षे कारावासाची तर सुखदेव यादव याला २० वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली. सुखदेव यादव याची २० वर्षांची शिक्षा पूर्ण » पान ७ वर

## अनिल अंबानींचा तडजोडीचा प्रस्ताव सेबीने फेटाळला



■ मुंबई

**येस** बँकेतील गुंतवणुकीतील आर्थिक गैरव्यवहारासंदर्भात आकारण्यात आलेला १८.२८ अब्ज रुपयांचा दंड भरण्यासाठी तडजोड करण्याचा उद्योजक अनिल अंबानी यांचा अर्ज सेबीने फेटाळला आहे.

अनिल अंबानी यांनी आपला गुन्हा मान्य न करता केलेला हा अर्ज फेटाळण्यात येत असून त्यांच्या व्यवहारामुळे गुंतवणूकदारांचे १८.२८ अब्ज रुपयांचे नुकसान झाले व त्याचा बाजारावर मोठा परिणाम झाला असल्याचे सेबीने म्हटले आहे. अनिल अंबानी यांच्या रियायन्स म्युच्युयल फंडने २०१६ ते २०१९ या काळात येस बँकेच्या टायर १ बाँड मध्ये २४५.३ कोटी अमेरिकन डॉलर एवढी रक्कम गुंतवली. बँक २०२० मध्ये अवसानायात गेल्यानंतर ही रक्कम रद्द झाली. रिलायन्स म्युच्युयल फंड ही कंपनी २०१९ मध्ये निप्पो लाईफ इन्शुरन्स कंपनीला विकण्यात आली. त्याचा व्यवहार हा तारखेच्या आधी दाखवण्यात आला.

सेबीने आपल्या आरोपात म्हटले की, येस बँकेत केलेली ही गुंतवणूक रियायन्सच्या इतर कंपन्यांच्या कर्जासाठी करण्यात आली. त्याचा गुंतवणूक बाजारावर मोठा परिणाम झाला व लोकांचे पैसे बुडाले.

## पुणे पोर्श कार अपघात प्रकरणी पोलीस जेजेबी निर्णयाविरुद्ध कोर्टात

■ पुणे

**पुण्यातील** पोर्श कार अपघात प्रकरणात १७ वर्षीय अल्पवयीन आरोपीवर प्रौढ म्हणून खटला चालवावा, अशी मागणी पोलिसांनी केली. या मागणीला बाल न्याय मंडळाने (जेजेबी) नकार दिला. या निर्णयाविरोधात पुणे पोलिसांनी सत्र न्यायालयात दाद मागितल्याची माहिती आज विशेष सरकारी वकील शिशिर हिराय यांनी दिली.

हिराय म्हणाले की, बाल न्याय मंडळाचा निर्णय चुकीचा होता असे म्हणत आम्ही ७ ऑगस्ट रोजी सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. अर्ज यादीत घेतल्यानंतर लवकरच सुनावणीची तारीख निश्चित केली जाईल. पुणे पोलिसांच्या एका अधिकाऱ्याने याबाबत माहिती देताना सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी मिळवल्यानंतरच पोलिसांनी सत्र न्यायालयात जेजेबीच्या आदेशाविरोधात अपील दाखल केले आहे. मागील महिन्यात जेजेबीने हा गुन्हा भीषण गुन्हा ठरत नसल्याचा निर्णय देत पोलिसांचा अर्ज फेटाळला होता. पुणे पोर्श अपघात प्रकरणातील १७ वर्षीय अल्पवयीन आरोपीविरुद्धचा खटला सध्या बाल न्याय मंडळात सुरू आहे. १९ मे २०२४ रोजी कल्याणीनगर येथे आरोपीच्या ताब्यातील पोर्श कारने दुचाकीला धडक दिल्याने अश्विनी कोष्टा आणि अनीश अवधिया या दोन जणांचा मृत्यू झाला होता. अपघातानंतर आरोपीला ताब्यात घेतले असतानाही बाल न्याय मंडळाने त्याला जामिनावर सोडले.

## जोगेश्वरी ट्रॉमा केअरमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप

■ मुंबई

**जोगेश्वरीतील** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयातील दीडशेहून अधिक कंत्राटी कर्मचाऱ्यांना मागील तीन महिन्यांपासून पगार मिळाला नाही. त्यामुळे आज भारतीय कामगार सेनेच्या नेतृत्वाखाली कंत्राटी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला.

महानगरपालिकेकडून या रुग्णालयातील सेवा पुरवण्यासाठी खासगी कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली आहे. अडीचशे ते तीनशे कर्मचारी येथे कंत्राटी पद्धतीवर कार्यरत आहेत. मात्र, मागील तीन महिन्यांपासून पगार न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या आर्थिक अडचणींमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. सणासुदीचे दिवस असूनही पगार न मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. या संपामुळे रुग्णालयातील दैनंदिन आरोग्यसेवेत अडथळा निर्माण झाला असून, अनेक रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठा त्रास सहन करावा लागला.

## योगेंद्र यादवांची कोर्टात धाव बिहारचे 'मृत' मतदार आणले

**आयोगाच्या एमएमआरएला आक्षेप**

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** निवडणूक आयोगाकडून बिहारमध्ये केल्या जात असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणावरून (सर) देशभर गदारोळ सुरू असताना सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय विश्लेषक योगेंद्र यादव यांनी आज बिहारमधील अशा दोन मतदारांना सर्वोच्च न्यायालयात हजर केले की, ज्यांची नावे निवडणूक आयोगाने मृत असा शिक्का मारून यादीतून काढून टाकली आहेत.

योगेंद्र यादव यांनी निवडणूक आयोगाच्या एसआयआरला याचिकेद्वारे



आक्षेप घेतला आहे. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान यादव यांनी न्या. सूर्यकांत आणि न्या. ज्योयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर या दोन मतदारांना हजर केले.

निवडणूक आयोगाचे वकील ज्येष्ठ विधिज्ञ राकेश द्विवेदी यांनी यादव यांच्या या कृतीची नाटकीपणा अशा शब्दांत संभावना केली. मतदार यादीत काही चुका असतील तर यादव यांना आयोगासमोर मांडून दुरुस्त करून घेता आल्या असत्या. त्यासाठी न्यायालयात येण्याची गरज नव्हती, असे द्विवेदी म्हणाले. यादव यांनी आयोगाने मतदार याद्यांमध्ये केलेल्या अनेक चुका न्यायालयासमोर मांडल्या. त्या न्यायालयाने सुनावणीस योग्य असल्याचे म्हटले आहे.

## बेस्ट निवडणुकीच्या निमित्ताने मनसे व उबाठाचा मेळावा

■ मुंबई

**दि** बेस्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत राज ठाकरे यांची मनसे बेस्ट कर्मचारी सेना आणि उद्धव ठाकरे यांची बेस्ट कामगार सेनेने हातमिळवणी करून उत्कर्ष पॅनल तयार केले आहे. ही निवडणूक सोमवार १८ ऑगस्ट रोजी होणार आहे.

निवडणुकीच्या प्रचार मोहिमेला गती देण्यासाठी उद्या संध्याकाळी ४ वाजता मुंबईतील शिरोडकर हायस्कूल येथे मनसे-उबाठाचा संयुक्त मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

## मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था सिंधुदुर्गात उबाठाचे आंदोलन

■ सिंधुदुर्ग

**गेली** ११ वर्षे सुरू असलेले मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण अद्याप अपूर्ण असून, महामार्गावरील खड्ड्यांमुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. कणकवली ते बांदा रस्त्याची चाळण झाली आहे. याविरोधात उबाठा गटाने माजी आमदार वैभव नाईक यांच्या नेतृत्वाखाली सिंधुदुर्गातील हुमरमळा येथे आज जोरदार आंदोलन केले. आंदोलकांनी रस्त्याची दुरवस्था, रखडलेले काम आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा मुद्दा उपस्थित केला. त्याचबरोबर रखडलेला महामार्ग लवकर पूर्ण करा, असे फलक घेऊन घोषणाबाजी करण्यात आली. तसेच महामार्गावरील खड्ड्यांची पूजा करून सरकारचा निषेध नोंदवला. मंत्री नितेश राणे यांनी १५ ऑगस्टपर्यंत महामार्गाचे काम पूर्ण होईल, असे आश्वासन दिले होते. ते न पाळल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. त्यानंतर पोलिसांनी वैभव नाईक यांच्यासह आंदोलकांना ताब्यात घेऊन नंतर » पान ७ वर

## नाशिक-चंद्रपूरमध्येही बनावट मतदार ओळखपत्रांचा घोळ सुरूच

**एकाच व्यक्तीची तीन ठिकाणी नावे**

■ नाशिक

**विरोधी** पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर मतचोरीचा आरोप केल्यानंतर राज्यात आणि देशात खळबळ उडाली असताना, नाशिक आणि चंद्रपूर जिल्ह्यातील देखील असाच प्रकार उघडकीस आला आहे. नाशिकमध्ये एकाच व्यक्तीच्या नावावर तीन वेगवेगळी मतदार ओळखपत्रे सापडली आहेत. तर चंद्रपूरमधील घुग्गुस गावात एकाच पत्त्यावर ११९ मतदारांची नोंद असल्याचे उघड झाले आहे.

नाशिकमध्ये अनेक बनावट मतदार ओळखपत्रे आढळून आली आहेत. उबाठाचे पदाधिकारी योगेश गांगुर्डे यांनी या प्रकरणाचा भंडाफोड करताना सांगितले की, तपासात एकाच व्यक्तीच्या नावावर तीन वेगवेगळी मतदार ओळखपत्रे सापडली आहेत. काही प्रकरणांत एकाच व्यक्तीचा फोटो वापरून वेगवेगळी नावे नोंदवण्यात आली असून, एका ओळखपत्रावर नाव महिलेचे असताना फोटो मात्र पुरुषाचा असल्याचेही उघड झाले आहे. अशा प्रकारे अनेक बनावट व विसंगत ओळखपत्रांचे वितरण झाल्याचा संशय आहे. हे पुरावे लवकरच निवडणूक आयोगाकडे सादर केले जाणार आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून अशा बनावट कार्ड तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस गावातील सचिन बांदुरकर यांचे ३५० क्रमांकाचे छोटेसे घर असून, येथे केवळ दोनच मतदार राहतात. मात्र, निवडणूक आयोगाच्या यादीत या पत्त्यावर तब्बल ११९ मतदारांची नोंद आहे. स्थानिक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केलेल्या पडताळणीत हा प्रकार उघड झाला आहे.

## शेअर बाजारात पुन्हा तेजी दोन्ही निर्देशांकांत वाढ


■ मुंबई

**देशांतर्गत** शेअर बाजारात कालच्या घसरणीनंतर आज चांगलीच तेजी दिसून आली. मजबूत जागतिक संकेत आणि देशांतर्गत महागाईचा दर कमी झाल्याची आकडेवारी प्रसिध्द झाल्यामुळे बाजारात सकारात्मक वातावरण होते. जुलै महिन्यातील किरकोळ महागाईचा दर आठ वर्षांच्या नीचांकी पातळीवर म्हणजेच १.५५ टक्के एवढा नोंदला गेला.

त्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये उत्साह दिसून आला. दुसरीकडे अमेरिकेने चीनवर लादलेल्या वाढीव आयात शुल्काची अंतिम मुदत आणखी ९० दिवसांनी वाढवल्याने आणि कच्च्या तेलाच्या किमती कमी झाल्यामुळे जागतिक बाजारांमध्येही सकारात्मक वातावरण होते. त्याचा भारतीय बाजाराला आधार मिळाला. दिवसअखेरीस मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ३०४.३२ अंकांच्या वाढीसह ८०,५३९.९१ अंकावर तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी १३१.९५ अंकांनी वाढून २४,६१९.३५ अंकांवर बंद झाला.

## मंत्री छगन भुजबळ यांचा गोंदियात ध्वजारोहणास नकार

**आता लोढांकडे जबाबदारी सोपविली**



■ मुंबई

**रायगड** आणि नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीत सुरू असलेली रस्सीखेच आता ध्वजारोहण कार्यक्रमापर्यंत पोहोचली आहे. नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाचा तिढा सुटला नसतानाच राष्ट्रवादीचे मंत्री छगन भुजबळ यांनी नाशिक सोडून गोंदियातील ध्वजारोहण कार्यक्रमाला जाण्यास नकार दिला आहे.

त्यामुळे आता गोंदियात ध्वजारोहणाची जबाबदारी मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. नाशिकमध्ये राष्ट्रवादीचे तीन आणि शिंदे गटाचा एक मंत्री असताना, जिल्ह्यात सर्वाधिक आमदार असल्याचा दावा करत राष्ट्रवादीने पालकमंत्रिपदासाठी इच्छा व्यक्त केली. तर शिवसेनेच्या वतीने ही जबाबदारी मंत्री दादा भुसे यांच्याकडे द्यावी, अशी मागणी झाली होती. तर भाजपा कुंभमेळ्याचे महत्त्व लक्षात घेऊन पालकमंत्रिपद सोडण्यास तयार नाही. दरम्यान यंदाही १५ ऑगस्टला मुख्य कार्यक्रमासाठी ध्वजारोहणाची जबाबदारी महाजन यांना देण्यात आली. तर गोंदियात ध्वजारोहणासाठी छगन भुजबळ यांचे नाव जाहीर झाले होते. याआधी २६ जानेवारी आणि १ मे महाराष्ट्र दिनी नाशिकमध्ये ध्वजारोहणाचा मान गिरीश महाजन यांनाच देण्यात आला होता. नाशिक जिल्ह्यात राष्ट्रवादीचे तब्बल सात आमदार असतानाही गोंदियाला का जायचे, अशी भूमिका छगन भुजबळ यांनी घेतली.

देश विदेश

# राजस्थानमध्ये कृत्रिम पावसासाठी प्रथमच ड्रोनद्वारे ढगपेरणी

■ जयपूर



**कृत्रिम** पाऊस पाडण्यासाठी पहिल्यांदाच ड्रोनच्या सहाय्याने ढगपेरणी करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राजस्थान सरकारने हाती घेतला आहे. बंगळुरु आणि अमेरिकेतील एका कंपनीच्या मदतीने राजस्थानच्या कृषी विभागाने नुकताच जयपूरनजिक रामगढ धरण परिसरात पहिला प्रयोग केला. मात्र कमकुवत मोबाईल नेटवर्कमुळे ड्रोनमधील जीपीएस यंत्रणा कुचकामी ठरली. त्यामुळे प्रयोग अयशस्वी ठरला.

कृत्रिम पावसाचा हा प्रयोग पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर स्थानिक रहिवाशांनी गर्दी केल्यामुळे प्रयोगामध्ये अडथळे आले. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीमारही करावा लागला. या अडथळ्यानंतरही प्रयोग सुरू ठेवण्यात आला. मात्र ढग फार उंचीवर असल्याने ड्रोन तिथपर्यंत पोहोचू शकले नाही. तसेच जीपीएस यंत्रणा ठप्प झाल्याने ढगांचे नेमके स्थान ड्रोनला निश्चित करता आले नाही.

राज्याचे कृषिमंत्री किरोरीलाल मिना यांनी सांगितले की, प्रयोगाच्या ठिकाणी बघ्यांची प्रचंड गर्दी उसळल्याने मोबाईल नेटवर्क जाम झाले. परिणामी प्रयोग फसला. पुढच्या वेळी मोबाईल नेटवर्क जामर लावून प्रयोग केला जाईल.

# दक्षिण कोरियाच्या माजी फर्स्ट लेडी किम केओन भ्रष्टाचार प्रकरणी अटक

■ सियोल

**दक्षिण** कोरियाच्या माजी राष्ट्राध्यक्ष युन सुक येओल यांच्या पत्नी आणि माजी फर्स्ट लेडी किम केओन यांना अटक झाली. त्यांना दक्षिण सियोल डिटेंशन सेंटरमध्ये हलवले. काल सियोल सेंट्रल डिस्ट्रिक्ट न्यायालयाने दक्षिण कोरियाच्या माजी फर्स्ट लेडी किम केओन यांच्या अटकेस मंजुरी दिली. विशेष सल्लागार मिन जूंग-की यांच्या टीमने ही मागणी केली होती. किम यांच्यावर डॉइच मोटर्स स्टॉक घोटाळ्यात २००९ ते २०१२ सहभाग, २०२२ आणि २०२४ च्या निवडणुकांमध्ये हस्तक्षेप, युनिफिकेशन चर्चमार्फत महागड्या भेटवस्तू स्वीकार करून कायद्यांचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. हे सर्व आरोप चौकशीत किम यांनी फेटाळले आहेत. जुलैमध्ये माजी राष्ट्राध्यक्ष युन यांना मागील वर्षीचे मार्शल लॉ लागू करण्याच्या अपयशी प्रयत्नामुळे दुसऱ्या वेळी अटक केली होती.

# कृत्रिम बुद्धिमत्तेने रोल्स रॉईस मोठी होईल! कंपनीला विश्वास

■ लंडन

**येत्या** काही दिवसांत रोल्स रॉईस या आघाडीच्या वाहन उद्योगाने आपला कारभार कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने करण्याचा निर्णय घेतला असून, त्यामुळे कंपनी युकेत आघाडीवर येईल, असा विश्वास कंपनीच्या व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

रोल्स रॉईसने झेक सरकारबरोबर लहान मॉड्युलर रिएक्टर पुरवण्याचा करार केला आहे. त्याचा वापर करून कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित डाटा केंद्र विकसित केले जाणार आहे. रोल्स रॉईसचे मुख्य कार्यकारी अधिकारी टुफन इरगिनबिल्गिक यांनी म्हटले की, २०२२ पासून कंपनीच्या कामामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येत आहे. त्याच्या वापरामुळे आम्ही येत्या काही वर्षात इंग्लंडमधील आघाडीची कंपनी म्हणून ओळखले जाणार आहोत.

# म्हादई पाणी तंटा लवादाला आणखी एक वर्षाची मुदतवाढ

■ पणजी

**म्हादई** पाणी तंटा लवादाला केंद्र सरकारने आणखी एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. यासंदर्भात जलशक्ती मंत्रालयाने अधिसूचना जारी केली आहे. यापूर्वी लवादाला फेब्रुवारी महिन्यात ६ महिन्यांची मुदतवाढ दिली होती. त्यानंतर आता १६ ऑगस्ट २०२६ पर्यंत पुन्हा मुदतवाढ मिळाली आहे.

म्हादई नदीच्या पाण्यावरून गोवा, कर्नाटक आणि महाराष्ट्र या राज्यांमध्ये वाद सुरू आहे. या वादावर तोडगा काढण्यासाठी केंद्र सरकारने २०१० मध्ये लवादाची स्थापना केली होती. ऑगस्ट २०१८ मध्ये लवादाने आपला अंतिम निकाल दिला, ज्यामध्ये गोव्याला २४ टीएमसी, कर्नाटकाला १३.४२ टीएमसी आणि महाराष्ट्राला १.१३ टीएमसी पाणी वापरण्याची परवानगी देण्यात आली होती. परंतु हा निकाल कोणत्याही राज्याला मान्य नसल्याने त्यांनी निकालाला आव्हान दिले आहे. त्यामुळे म्हादई पाणी तंटा लवादाला वारंवार मुदतवाढ मिळत गेली आहे.

# राजस्थानच्या दौसामध्ये कंटेनर-पिकअपची धडक

■ जयपूर

**११ जणांचा मृत्यू**

**राजस्थानमधील** दौसा येथे आज पहाटे कंटेनर आणि पिकअप यांच्यात झालेल्या भीषण धडकेत ११ जणांचा मृत्यू झाला तर ८ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये ७ मुले आणि ४ महिलांचा समावेश असून, सर्वजण उत्तर प्रदेशातील कासगंज (एटा) येथील रहिवासी आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, अपघात पहाटे साडेतीन वाजता सैंथल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बापी गावाजवळ झाला. पिकअपमधील सर्व भाविक खाटूश्याम दर्शन करून परतत होते. यावेळी कंटेनरने मागून पिकअपला जोरदार धडक दिली. पिकअपमध्ये २२ हून अधिक भाविक होते. धडकेत १० जणांचा मृत्यू झाला. यात पूर्वी (३), प्रियांका (२५), दक्षा (१२), शीला (३५), सीमा (२५), अंशु (२६) आणि सौरभ (३५) यांचा समावेश आहे, तर चार जणांची ओळख अद्याप पटलेली नाही. पंतप्रधानांनी मृतांना २ लाख व जखमींना ५० हजारांची मदत जाहीर केली आहे.

# दुर्मीळ खनिज क्षेत्रातील चीनच्या एकाधिकाराला ऑस्ट्रेलियाचे आव्हान

■ पर्थ



**इलेक्ट्रिक** वाहने, सौर ऊर्जा या वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रातील दुर्मीळ खनिजांच्या पुरवठ्यात चीनची एकाधिकारशाही आहे. चीनमधून या खनिजाचा सर्वाधिक पुरवठा होत असतो. त्याला आव्हान देण्याची तयारी ऑस्ट्रेलियाने सुरू केली आहे. पर्थपासून काही किलोमीटर दूर असलेल्या इनेएबाच्या डोंगरांवर या दुर्मीळ खनिजाचा साठा सापडला असून, त्याच्या शुद्धीकरणासाठी अब्जावधी डॉलरचा करार करण्यात आला आहे.

ऑस्ट्रेलियाच्या पर्थजवळ कोट्यवधी टन स्टॉकपिले या खनिजाचा शोध लागला आहे. हे खनिज इलेक्ट्रिक वाहने, पवनचक्कीचे टर्बाईन व संरक्षण उपकरणांमध्ये वापरले जाते. या खनिजाच्या शुद्धीकरणासाठी ऑस्ट्रेलियन सरकारने इलुका कंपनीकडून १.६५ अब्ज डॉलरचे कर्ज घेतले आहे. या पैशातून ही रिफायनरी उभारण्यात येणार असून त्याद्वारे इलुका कंपनीचे दुर्मीळ खनिजाचे उत्पादन ५० ते १७० टक्क्यांनी वाढेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या शुद्धीकरणामुळे २०३० पर्यंत पश्चिमेकडील खनिजाची मागणी पूर्ण करता येईल. त्यामुळे या खनिजाबाबतची चीनवरचे अवलंबित्व कमी होईल, असा विश्वास ऑस्ट्रेलियाने व्यक्त केला आहे.

# बच्चू कडूंना ३ महिने साध्या कारावासाची शिक्षा

■ मुंबई

**माजी** मंत्री आणि आमदार बच्चू कडू यांना २०१८ साली आयएएस अधिकाऱ्यावर हल्ला आणि धमकी दिल्याप्रकरणी मुंबई सत्र न्यायालयाने दोषी ठरवले आहे. त्यांना ३ महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश सत्यनारायण आर. नवंदर यांनी शिक्षा सुनावताना सांगितले की, शिक्षेचा उद्देश केवळ आरोपीला समज देणे हा नाही, तर भविष्यातील संभाव्य चुकीच्या कृत्यांना आळा घालणे हा आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयाचा आदर राखला जावा आणि तक्रारींसाठी कायदेशीर मार्गांचा अवलंब केला जावा. मात्र कडू यांच्या विनंतीवरून त्यांची शिक्षा अपील दाखल करण्यासाठी स्थगित करण्यात आली आणि त्यांना १० हजार रुपयांचा दंड ठोठावून जामीन मंजूर करण्यात आला. बच्चू कडू यांच्यावर कलम ३५३ (सरकारी अधिकाऱ्यावर हल्ला) आणि ५०६ (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता, त्यामध्ये ते दोषी ठरले. मात्र, कलम ५०४ (जाणीवपूर्वक अपमान) अंतर्गत त्यांची निर्दोष मुक्तता झाली.

२६ सप्टेंबर २०१८ रोजी बच्चू कडू हे त्यांच्या काही सहकाऱ्यांसह मंत्रालयातील तत्कालीन महाराष्ट्र आयटी विभागाचे संचालक प्रदीप पी. यांच्या केबिनमध्ये घुसले होते. त्यांनी महापरीक्षा भरती पोर्टलच्या समस्यांबाबत अधिकाऱ्याला प्रश्न विचारत, एक लेखी निवेदन दिले होते आणि त्वरित अहवालाची मागणी केली होती. यावेळी प्रदीप पी. यांनी प्रत्युत्तरासाठी वेळ लागेल असे सांगितल्यावर कडू आक्रमक झाले आणि त्यांनी अधिकाऱ्याला शिवीगाळ केली. त्यांचा आयपॅड उचलून त्यांना मारण्याचा इशाराही यावेळी दिला होता.

# गायीला राष्ट्रीय प्राणी घोषित करण्याचा कोणताही विचार नाही

■ नवी दिल्ली

**केंद्र सरकारने दिले संसदेत स्पष्टीकरण**

**गायीला** राष्ट्रीय प्राणी घोषित करण्यासाठी कोणताही कायदा करण्याची केंद्राची कोणतीही योजना नाही, असे केंद्र सरकारने काल संसदेत स्पष्ट सांगितले. केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय राज्यमंत्री एस.पी.सिंह बघेल यांनी ही माहिती संसदेत दिली.

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री त्रिवेंद्र सिंह रावत यांनी लोकसभेत विचारलेल्या प्रश्नाच्या लेखी उत्तरात बघेल यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले की, गायीला राष्ट्रीय प्राणी घोषित करण्याचा विचार नाही. संविधानाच्या कलम २४६(३) नुसार, केंद्र आणि राज्यांमधील कायदेविषयक अधिकारांनुसार, प्राण्यांचे संरक्षण हा असा विषय आहे ज्यावर राज्य विधिमंडळाला कायदे करण्याचे विशेष अधिकार आहेत.

# पालिका आरोग्य स्वयंसेवकांचा निवडणूक कामाला स्पष्ट नकार

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेची निवडणूक तोंडावर आलेली असताना पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याच्या अंतर्गत काम करणाऱ्या ३ हजारांपेक्षाही जास्त आरोग्य स्वयंसेविकांनी निवडणूक काम करण्यास स्पष्ट नकार दिला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही पालिकेने या आरोग्य स्वयंसेविकांना कायम सेवेत सामावून घेतलेले नाही. त्यामुळे त्यांनी हा टोकाचा निर्णय घेतला आहे. त्यांच्यावर निवडणूक कामासाठी जबरदस्ती केली जात असल्याने त्याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली जाणार आहे.

अनेक वर्षांपासून महापालिका आरोग्य खात्यात विविध योजनांवर काम करणाऱ्या ३ हजारांपेक्षा जास्त आरोग्य स्वयंसेविकांना पालिका कर्मचाऱ्यांचा दर्जा नाकारत कायमस्वरूपी सेवेत सामावून घेतलेले नाही. आम्ही जर महापालिकेचे कर्मचारी नाही, असे पालिकेचे म्हणणे असेल तर आम्ही पालिका निवडणुकीचे काम का करावे, असा सवाल करीत त्यांनी निवडणूक कामकाज करण्यास स्पष्ट नकार दर्शवला आहे. या आरोग्य स्वयंसेविका पावसाळ्यात हिवताप, डेंग्यू आदी साथीच्या आजारांविषयी जनजागृती करणे, आदी कामे करत असतात. तरीही त्यांना न्याय मिळत नाही. दरम्यान या स्वयंसेविकांना निवडणूक कामे करण्यासाठी जबरदस्ती केली जात असल्याचे आरोग्यसेवा कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रकाश देवदास यांनी दिली.

# अकरावी प्रवेशासाठी आता विशेष फेरी! १९ रोजी निवड यादी

■ मुंबई

**आतापर्यंत** अकरावीच्या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत प्रवेश न मिळालेल्या राज्यातील विद्यार्थ्यांसाठी आता विशेष फेरी राबवण्यात येत आहे. काल मंगळवार १२ ऑगस्टपासून ही विशेष फेरी प्रक्रिया राबविण्यास सुरुवात झाली असून, या फेरीची निवड यादी १९ ऑगस्ट रोजी जाहीर केली जाणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली. राज्यात अकरावी प्रवेशासाठी चार नियमित फेऱ्या आणि एक सर्वांसाठी खुली विशेष फेरी राबविण्यात आली आहे. आत्तापर्यंत तब्बल १२ लाखांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, प्रवेशासाठी अद्यापही साडेनऊ लाखांच्या जवळपास जागा रिक्तच राहिल्या असल्याचे स्पष्ट झाले आहे. अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत सर्वांसाठी खुला प्रवेश या फेरीत ३ लाख ४८ हजार ८७४ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे.

# माहीममध्ये टॅक्सीवर मोठे झाड कोसळले

■ मुंबई



**माहीम** येथील शितलादेवी मंदिराजवळ आज एक मोठे झाड टॅक्सीवर कोसळले. या दुर्घटनेत टॅक्सीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. घटनेच्या वेळी टॅक्सीचालक वाहनाबाहेर असल्याने कोणतीही दुखापत झाली नाही. झाड पडल्यामुळे रस्ता बंद झाला व मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. त्यानंतर पालिका प्रशासनाने झाड हटवण्याचे काम तातडीने सुरू केले.

# कर्नाळा बँकेच्या माजी अधिकाऱ्याला मालमत्ता विकण्याची परवानगी

■ रायगड

**कर्नाळा** बँक घोटाळा प्रकरणी अटकेत असलेला बँकेचा माजी मुख्य कार्यकारी अधिकारी हेमंत सुताने याला त्याची वडिलोपार्जित मालमत्ता विकण्याची परवानगी देण्यात आली आहे. विशेष खासदार आमदार न्यायालयाने त्याला ही परवानगी दिली आहे. हेमंत सुताने हा सध्या ५१२.५४ कोटी रुपयांच्या बँक घोटाळ्यातील एक आरोपी आहे. त्याच्या आर्थिक अडचणींमुळे त्याने आपली वडिलोपार्जित जमीन विकण्याची परवानगी न्यायालयाकडे मागितली होती. त्याला फिर्यादी पक्षाने आक्षेप घेतला. भविष्यात त्यांच्याकडून काही रक्कम वसूल करायची गरज भासल्यास या मालमत्तेची गरज पडू शकेल. असे त्यांनी म्हटले होते. यावर विशेष न्यायाधीश आर. नवेंदर यांनी म्हटले की, ही मालमत्ता त्यांची वडिलोपार्जित आहे. त्याचा कोणत्याही तपास यंत्रणेने या आधी कधीही उल्लेख केला नाही. त्याच्या बँक घोटाळ्याशी संबंधित २७ मालमत्ता याआधीच जप्त करण्यात आल्या आहेत. वसुलीसाठी या मालमत्ता उपलब्ध असून, वडिलोपार्जित मालमत्ता विकण्याचा त्यांचा मूलभूत हक्क आहे. त्यामुळे ही मालमत्ता विकण्याची परवानगी देण्यात येत आहे.

# साताऱ्यात १५ ऑगस्टपासून महावितरण विरोधात उपोषण

■ सातारा

**शेतकऱ्यांचा संताप उसळला**

**जिल्ह्यातील** माण-खटाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी आता महावितरणच्या बेजबाबदार कारभाराविरोधात १५ ऑगस्टपासून सातारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे.

शेनवडी सबस्टेशन अंतर्गत शेती पंपांना गेल्या अनेक महिन्यांपासून अतिशय कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने विहिरीत पाणी असूनही मोटारी बंद पडल्या आहेत, पिके करपली आहेत आणि लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होऊन नैराश्याच्या गर्तेत ढकलले गेले आहेत. त्यामुळेच आता शेतकऱ्यांनी हा आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे. सामाजिक कार्यकर्ते महेश करचे व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेश प्रवक्ते अनिल पवार यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार आहे. आतापर्यंत टप्याटप्प्याने अनेक आंदोलने झाली, पण तीन महिने उलटूनही एकही ट्रान्सफॉर्मर बसवण्यात आलेला नाही. उलट जांभुळणी, गंगोती, पळसावडे, देवापूर, पुळकोटी, वळई, पानवन, शेनवडी, गोंदवले खुर्द, गुरसाळे, उंबर्डे, नढवळसह अनेक गावांमध्ये ट्रान्सफॉर्मर वारंवार जळत असून, ते बदलण्यासाठी दिरंगाई सुरू आहे. त्यात वाहतुकीसाठी व ट्रान्सफॉर्मर बदलून देण्यासाठी शेतकऱ्यांकडून पैसे घेण्याचा आरोपही करण्यात आला आहे.

# 'म' मराठीचा मराठी मनांसाठी दहीहंडीपूर्वी मनसेची बॅनरबाजी

■ ठाणे

**हिंदी** सक्तीच्या मुद्यावरून राज्यभरात मराठीचा मुद्दा गाजत असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने ठाण्यात दहीहंडीपूर्वी बॅनरबाजी करत हा मुद्दा पुन्हा गाजवला आहे. बॅनरवर 'म' मराठीचा 'मराठी सणांसाठी आणि मराठी मनांसाठी' असा ठळक उल्लेख करण्यात आला आहे.

मनसे नेते अविनाश जाधव यांच्या पुढाकाराने ठाण्यातील नौपाडा परिसरातील भगवती शाळेच्या मैदानात दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या दहीहंडीसाठी मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे देखील उपस्थित राहणार आहेत. याच परिसरात ही बॅनरबाजी अविनाश जाधव यांच्याकडून करण्यात आली आहे. हिंदी सक्तीच्या मुद्यावर मागील महिन्यात मोठा वादंग झाला होता. ठाकरे बंधूंनी या विरोधात मोर्चा काढण्याची घोषणा केल्यानंतर अखेर सरकारला आपले दोन्ही निर्णय मागे घ्यावे लागले होते.

# पंढरपूर कॉरिडॉरवरून वाद! वारकऱ्यांचा भूसंपादनाला विरोध

■ पंढरपूर

**बहुचर्चित** पंढरपूर कॉरिडॉर प्रकल्पावरून वारकरी संप्रदाय आणि प्रशासन यांच्यातील वाद चिघळला आहे. नुकत्याच झालेल्या वारकरी आणि जिल्हाधिकारी यांच्या बैठकीत वारकऱ्यांनी पंढरपूरच्या विकासाला पाठिंबा दिला. मात्र कॉरिडॉरसाठी होणाऱ्या भूसंपादनाला तीव्र विरोध दर्शवला. तर जिल्हाधिकाऱ्यांनी कॉरिडॉर कोणत्याही परिस्थितीत पूर्ण होणारच, अशी ठाम भूमिका घेतली आहे.

कॉरिडॉर तयार करताना धार्मिक आणि सांस्कृतिक भावना जपल्या जाव्यात. विकासकामांमध्ये वारकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी वारकरी संप्रदायाने एक अभ्यास समिती तयार करावी. यात वारकऱ्यांचा देखील समावेश करावा, अशी मागणी वारकऱ्यांची आहे. ही मागणी ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहेत. या बैठकीत प्रशासनाने कॉरिडॉरमधून होळकर वाडा आणि शिंदे सरकार वाडा वगळण्याची वारकऱ्यांची मागणी मान्य केली आहे. या दोन्ही वाड्यांना २०० वर्षांचा ऐतिहासिक वारसा लाभला आहे. त्यामुळे या ऐतिहासिक आणि हेरिटेज वास्तूंचे जतन आणि संवर्धन केले जाणार आहे. बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले की, आता कॉरिडॉर होणार की नाही यावर चर्चा नको, तो होणारच आहे. कॉरिडॉरमधील मंदिरे, समाधी आणि अनेक हेरिटेज मठांचे जतन व संवर्धन शासन करणार आहे. यामुळे वारकऱ्यांच्या काही मागण्या मान्य झाल्या असल्या तरी, भूसंपादनाच्या मुद्यावर अजूनही तोडगा निघालेला नाही.

# मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावांत यंदा कमी पाऊस

■ मुंबई



**मुंबई** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही प्रमुख तलावांमध्ये यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आहे. पावसाने जुलै महिन्यापर्यंत दमदार हजेरी लावली, तरीही हा पाऊस मागील वर्षाच्या जुलैमधील पावसापेक्षा कमीच आहे. त्यातच मागील काही दिवसांत पावसाने विश्रांती घेतल्याने एकूण पाणीसाठ्यात किंचितशी घट झाली आहे. मुंबई महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने जाहीर केलेल्या अहवालानुसार, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही तलावांमध्ये सध्या ८९.२० टक्के इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र, गेल्यावर्षी याचदिवशी हाच पाणीसाठा ९२.५५ टक्के इतका होता. विहार तलावात यावर्षी २७२० मिमी पाऊस झाला, तर गेल्या वर्षी यावेळेत या तलावात २४०० मिमी पाऊस पडला होता. तर तुळशी तलावात यावर्षी ३३०९ मिमी पाऊस झाला असून, गेल्या वर्षी ३३६३ मिमी पाऊस झाला होता. त्याचप्रमाणे भातसा तलावात गेल्यावर्षी २१४६ मिमी पाऊस झाला होता. तर यंदा १९९० मिमी इतका पाऊस पडला आहे. अन्य अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा मोडक सागर, तानसा आदी तलावांची स्थितीही थोडीफार अशीच आहे.

# धाराली गावातील पांडवकालीन कल्प केदार मंदिर गाळाखाली गडप

■ उत्तरकाशी

**उत्तरकाशी** जिल्ह्यातील धाराली गावात खीरगंगा नदीला आलेल्या पुराने गावाचा विनाश केला. या जलप्रलयात गावातील घरे, रेस्टॉरंट आणि संस्कृतीचे प्रतीक मानले जाणारे प्राचीन कल्प केदार मंदिर गाळाखाली गडप झाले. हे पांडवकालीन मंदिर पांडवांनी वनवासात बांधल्याची आख्यायिका आहे. मागील शतकात हिमनदीच्या हालचालींमुळे मंदिराचा मोठा भाग जमिनीत गडप झाला होता. फक्त काळभैरवाचे कोरीव काम असलेला घुमट उरला होता. परंतु आता आलेल्या पुरामुळे तो घुमटही नष्ट झाला. मंदिरातील शिवलिंग गेल्या अनेक दशकांपासून मातीखाली आहे. चारधाम तीर्थ पुरोहित महासभेचे सरचिटणीस बृजेश सती यांनी सांगितले की, जब कल्प केदार केवळ एक स्थान नव्हते, ते या संपूर्ण परिसराचा आध्यात्मिक आधार होता. आद्य शंकराचार्यांनी ते पुनर्स्थापित केले होते. त्या मंदिराचे आध्यात्मिक महत्त्व अनन्यसाधारण होते. हे केदारनाथाचे प्राचीन रूप मानले जात असे.

# मंत्रालयात वाहन पार्किंगवर बंधने

■ मुंबई

**मंत्रालयाच्या** सुरक्षेसह वाढत्या पार्किंग समस्येवर तोडगा काढण्यासाठी गृह विभागाने कठोर नियम लागू केले आहेत. आता ठराविक अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना (व्हीआयपी) वगळता इतर कुणालाही मंत्रालयात वाहन पार्किंगची परवानगी मिळणार नाही. या निर्णयाचा फटका खासदार आणि आमदारांनाही बसणार असून, त्यांना केवळ कार ड्रॉप पास दिला जाईल. म्हणजेच प्रवाशांना मंत्रालयात सोडल्यानंतर गाडी बाहेर काढावी लागेल. गेल्या काही वर्षांत मंत्रालयात येणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड वाढल्याने पार्किंगची जागा अपुरी पडत होती. तसेच सुरक्षेलाही धोका निर्माण होत होता. या पार्श्वभूमीवर बिल्डर, दलाल आणि कार्यकर्त्यांच्या गाड्यांनाही आता पार्किंग सुविधा मिळणार नाही. फक्त पासधारकांनाच प्रवेश मिळेल. राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्री यांसारख्या पदाधिकाऱ्यांनाच पार्किंगसाठी विशेष पास दिले जातील. खासदार, आमदार, उपसचिव आणि सहसचिवांना कार ड्रॉप पास मिळेल. तसेच त्यांना वारंवार गाड्या बदलता येऊ नयेत म्हणून एकच स्टिकर देण्यात येईल.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# भूतदया की भूतदहशत

मनुष्य म्हटल्यानंतर माणूसकी हा त्यांचा अंगभूत गुण स्वाभाविक ठरतो. सामाजिक स्तरावर हीच माणूसकी जीवनमूल्यांच्या स्वरूपामध्ये गृहित धरली जाते. परंतु माणूसकीचा स्वभावधर्म जरी एक असला तरी ती व्यक्त करण्याचे अनेक प्रकार पाहायला मिळतात. प्रामुख्याने माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे ही त्यातली सहज अपेक्षा स्वीकारली गेलेली आहे. याच स्वभावाच्या अंतर्गत दया, क्षमा, शांती, करूणा प्रेम, स्नेह, परोपकार यासारखे पैलूदेखील व्यक्त होतात. माणसाने माणसाशी केलेला स्नेहशील किंवा प्रेमळ व्यवहार हा प्रामुख्याने माणूसकीचा परिचय देतो. तर दया करूणा, क्षमा याच भूतदयेच्या माध्यमातूनही प्रकटीकरण होत राहते. म्हणजे माणसाव्यतिरिक्त या सृष्टीतल्या सगळ्याच प्राणीमात्रांवर दयादृष्टी ठेवणे म्हणजेच प्रेम करणे हा सगळा भाग भूतदयेत येतो. परंतु या भूतदयेचं स्वरूप एका विशिष्ट मर्यादेपर्यंत स्वीकारता येऊ शकते. जोपर्यंत मनुष्याच्या जगण्याला त्याचा त्रास होत नाही तोपर्यंत ही भूतदया मान्य करता येऊ शकते. कारण सापाला कितीही दूध पाजले तरी त्याचे विषच होते. आणि अशा प्राण्यांविषयीची भूतदया एका विशिष्ट मर्यादेपर्यंत व्यक्त करता येऊ शकते. एवढेच नव्हे तर कोणताही प्राणी त्यांच्याशी कितीही लळा लावला, प्रेम लावले तरी जोपर्यंत त्रास देत नाहीत तोपर्यंतच ते हवेहवेसे वाटतात. कारण व्यापक समाजहिताचा आणि व्यवस्थेचा विचार करताना समाजाचे म्हणजे समाजातल्या प्रत्येक माणसाचे जनजीवन अधिक महत्त्वाचे मानले जाते. म्हणूनच आतापर्यंत जेव्हा जेव्हा कोणत्याही प्राण्यांनी माणूस किंवा समाजाला त्रास दिला त्यावेळी त्याचा बंदोबस्त करणे क्रमप्राप्त ठरते. सध्या राजधानी दिल्लीमध्ये भटक्या कुत्र्यांविषयीचे आंदोलन सुरू आहे. तर आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत कबुतरांबाबत आंदोलन केले जाते आहे. गेल्या वर्ष दोन वर्षांतल्या ह्या घडामोडींचा आढावा घेतला तर मांजरी, कुत्रे, बिबटे आणि आता कबुतरं या प्राण्यांच्या मुक्त संचारावरून मोठ्या प्रमाणावर तक्रारी येत आहेत.

### कुत्री, मांजरी आणि बिबटे

भूतदया हा देखील एक महत्त्वाचा मानवी गुण असला तरी त्याचे स्वरूप आजच्या बदलत्या काळामध्ये नीट लक्षात घ्यावे लागेल. काही शतकांपूर्वीची समाजव्यवस्था आणि आजची सामाजिक परिस्थिती यामध्ये जमीन आसमानाचा फरक पडलेला आहे. विशेषतः महानगरांची संख्या विचित्र वेगाने वाढते आहे. या महानगरांना येणारी सूज, तिथली लोकसंख्या, त्या प्रमाणात अपुऱ्या पडणाऱ्या नागरी सोयी सुविधा आणि अशा परिस्थितीमध्ये भूतदयेच्या नावाखाली चालणारा हा सगळा प्रकार समाज व्यवस्था म्हणून निश्चितच विचार करायला लावतो. कारण सामाजिक आरोग्य हे अधिक महत्त्वाचे आहे. मनुष्य जिवंत राहिला तरच त्याला या भूतदयेचाही अविष्कार दाखवता येऊ शकतो. परंतु प्राणीमात्रांना केली जाणारी मदत ही आपल्या अंगलट येवू नये इथपर्यंत तरी त्याचे भान पाळावे लागेल. मुंबईतला कबुतरांचा विषय असो किंवा दिल्लीतल्या भटक्या कुत्र्यांचा विषय असो. दिल्लीत तर या भटक्या कुत्र्यांची अवस्था इतकी प्रचंड झालेली आहे की सर्वसाधारण माणसाला तो केव्हा चावा घेईल आणि कायमचा जायबंदी करेल हे सांगता येत नाही. जीव गमावण्यापर्यंत काही प्रकार घडले आहे. त्याची गंभीरता लक्षात घेणे आवश्यक ठरते. एकाच वेळेला या भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी जेव्हा अंगावर येतात तेव्हा एकटा असलेला मनुष्य किंवा महिला अत्यंत घाबरून जाते आणि त्या परिस्थितीत स्वतःची सुटका करून घेणे सुद्धा अशक्य घेऊन जाते. अशा या भटक्या कुत्र्यांच्या दहशतीला आळा घालण्यासाठीच दिल्ली उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले होते. त्याआधी दिल्ली सरकारने या भटक्या कुत्र्यांचा त्रास वाचवण्याकरता त्यांच्यावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आणि विशेषतः कुत्री पाळण्यासंदर्भातही काही नियमावली तयार केली गेली. आता या कुत्री पाळण्याच्या नियमावली विरुद्ध आणि भटक्या कुत्र्यांवर कारवाई करण्याच्या विरोधात अनेक पर्यावरणवादी किंवा प्राणीप्रेमी एकत्र आलेले आहेत आणि सरकारच्या निर्णयाला विरोध केलेला आहे. परंतु आज माणसाचा जीव महत्त्वाचा आहे. प्राणी वाचवणे किंवा त्यांच्या जीविताची काळजी घेणे हा जरी मनुष्याचा स्वभाव असला तरी प्रत्येक वेळेला त्याचा जीव वाचवण्यासाठी दहा मनुष्यांचा जीव वाया घालवणे हे परवडणारे नाही.

### सामाजिक आरोग्य महत्त्वाचे

अशा परिस्थितीमध्ये कुत्र्यांना, कबुतरांना महत्त्व द्यायचे की, माणसाचा जीव वाचवायचा याचा सारासार विचार किंवा तारतम्य ठेवावे लागेल. तोच प्रकार मुंबईच्या कबूतर खान्यांबाबतही पाहायला मिळतो आहे. कबूतरखाने बंद करण्याच्या विरोधामध्ये ज्या पद्धतीने लोक एकत्र येत आहेत आणि कबुतरांविषयी जी काही भूतदया उफाळून आलेली आहे ती अत्यंत चिंताजनक म्हणावी लागेल. कारण ज्या कबुतरांमुळे किंवा त्यांच्या विष्ठेमुळे क्षयरोग होण्यापासून ते दम्याचे विकार बळावण्यापर्यंत असे रोग होऊ शकतात, हे आता विज्ञानातून, संशोधनातून सिद्ध झालेले आहे. इतका स्पष्ट धोका जर या कबुतरांच्या गोष्टीपासून किंवा त्यांना घातल्या जाणाऱ्या दाण्या-पाण्यापासून उद्भवत असेल तर अशा कबुतरांचा बंदोबस्त करणे अत्यंत क्रमप्राप्त ठरते. आज कोणीही व्यक्ती आपल्या घरामध्ये कबुतरांना येऊ देत नाही. घरामध्ये कोणी कबुतरांना दाणे टाकत नाही म्हणजेच जे काही प्रेम आहे किंवा त्यांच्याविषयीची भूतदया आहे ती बाहेर व्यक्त करायची आणि बाहेर सामाजिक स्तरावर त्याचा किती त्रास झाला तरी त्याबद्दल काही चिंता बाळगायची नाही त्याबद्दल बेजबाबदारपणा दाखवायचा हे सामाजिक दृष्ट्या सुद्धा अत्यंत घातक म्हणावे लागते. तोच प्रकार अनेकांच्या कुत्रे पाळण्यासंबंधात सुद्धा आहे. कुत्रा पाळणे ही ज्याची त्याची आवड असू शकते. परंतु या कुत्र्यांना बाहेर आणून फिरवले जाते आणि त्यांच्या विष्ठेचा आणि त्यांचा इतर त्रास अन्य लोकांना विनाकारण सोसावा लागतो. यासंदर्भात प्राथमिक भान ठेवण्याची आवश्यकता आहे. भूतदया दाखवावी, परंतु त्याची दहशत निर्माण होऊ नये.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**महत्त्व माणसाचं नसतं तर ते त्यांच्या उत्कृष्ट स्वभावाचं आणि उत्तम आचरणाचं असतं. कोणी एका क्षणात आपलं मन जिंकून जातं तर कोणी आयुष्यभर सोबत राहूनही परकंच राहतं.**

## पंचांग

**गुरुवार, १४ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**श्रावण कृष्ण षष्ठी**
**नक्षत्र : रेवती**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते ०९-०५ मीन**
**०९-०६ ते २४.०० मीन**



**रवी उदय- ०६-२१**
**रवी अस्त- १९-०३**

**पतेती, बृहस्पती पूजन**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८९०८११६४२३, ८९०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### चिली चीज वडापाव

★ **साहित्य :-** बटाटा - २ मध्यम आकाराचे, बेसन - १/२ कप रिफाईंड तेल - २ चमचे, कढीपत्ता - ६, मोहरी पावडर - ३/४ टीस्पून, धनिया पावडर- १ टीस्पून, साखर - ३/४ टीस्पून, लिंबाचा रस - १ टेबलस्पून, कांदा - अर्धी वाटी, लसूण पावडर - १ टीस्पून, लो फॅट मोझेरेला चीज - १/४ कप किसलेले, मीठ - चवीनुसार, मोहरी - १/२ टीस्पून, लसूण- १ टीस्पून बारीक चिरून, हल्दी पावडर - १/२ टीस्पून, लाल मिरची पावडर - १ टीस्पून, हिरवी मिरची - १/४ चिरलेली, बेकिंग सोडा - १ चिमूटभर, चिंचेची चटणी- १ टेबलस्पून, हिरवी धणे - १ कप चिरलेली, चीज - अर्धा कप, पाव- ४.

★ **कृती :-** चिली चीज वडापाव बनवण्यासाठी प्रथम बटाटे उकळून चांगले मॅश करा. यानंतर कढईत तेल गरम करून त्यात कढीपत्ता, लसूण, मोहरी, हिरवी मिरची आणि मीठ घालून परतून घ्या. आता मॅश केलेले बटाटे, तिखट, धनेपूड आणि मोहरी पावडर घाला. त्यानंतरच बेसन, लिंबाचा रस आणि साखर घालून मिक्स करा. आता गॅस बंद करा आणि हे मिश्रण बाजूला ठेवा. यानंतर मिश्रण बरणीत हिरवी धणे, हिरवी मिरची आणि शिजवलेले मिश्रण घाला. नंतर ते चांगले बारीक करून बाजूला ठेवा आणि नंतर भांड्यात बेसन, हळद, बेकिंग सोडा आणि मीठ घाला. यानंतर आवश्यकतेनुसार पाणी घालून थोडे जाडसर पीठ बनवा. यानंतर शेवटी त्यात तेलाचे काही थेंब टाका आणि मिक्स करा. नंतर कढईत तेल टाकून गरम करा. यानंतर बटाट्याचे मिश्रण घेऊन ते बेसनाच्या द्रावणात बुडवा. नंतर हे वडे डीप फ्राय करून प्लेटमध्ये काढा. यानंतर वडापाव अंबाडा कापून त्यात चिंचेची चटणी आणि लसूण पावडर घाला. नंतर त्यावर हिरवी मिरची वडा ठेवून किसलेले पनीर आणि चीज घाला. तुमचा चविष्ट मिरची चीज वडापाव तयार आहे.



# अहमदाबादमध्ये २०३० ची राष्ट्रकुल स्पर्धा? भारत अंतिम बोलीसाठी प्रस्ताव देणार

**भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने २०३० मध्ये होणार्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनासाठी भारताच्या बोलीला मान्यता दिली. विशेष सर्वसाधारण सभेत ही मंजुरी देण्यात आली. भारताने या स्पर्धेच्या आयोजनासाठी मार्चमध्ये अभिव्यक्ती स्वारस्य शिखर परिषद आयोजित केली होती. आता भारताला ३१ ऑगस्टपूर्वी अंतिम बोलीसाठी प्रस्ताव सादर करावा लागेल. यापूर्वी भारताने २०१० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले होते.**



■ नवी दिल्ली

कॅनडा शर्यतीतून बाहेर पडल्यानंतर २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्याची भारताची शक्यता वाढली आहे.राष्ट्रकुल क्रीडा संचालक डॅरेन हॉल यांच्या नेतृत्वाखालील एका पथकाने अहमदाबादमधील स्थळांना भेट दिली आणि राष्ट्रकुल क्रीडा अधिकाऱ्यांनी गुजरात सरकारच्या अधिकाऱ्यांसोबत बैठकही घेतली.या महिन्याच्या अखेरीस आणखी एक शिष्टमंडळ अहमदाबादला पोहोचण्याची अपेक्षा आहे.या भेटीनंतर नोव्हेंबरच्या अखेरीस राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची महासभा यजमान देश निश्चित करेल. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेव्यतिरिक्त भारत २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धेचे आयोजन करण्याची तयारी करत आहे.गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये भारताने २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी बोली लावली होती.२०३२ च्या ऑलिम्पिक यजमानपदाची जबाबदारी ऑस्ट्रेलियातील ब्रिस्बेन येथे सोपवण्यात आली आहे. तर २०२८ चे ऑलिम्पिक लॉस एंजेलिस येथे होणार आहेत.बहु-क्रीडा खेळांचे आयोजन भारताने आतापर्यंत ३ बहु-क्रीडा खेळांचे आयोजन केले.यामध्ये २०१० मधील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा १९८२ आणि १९५१ मधील आशियाई क्रीडा स्पर्धांचा समावेश आहे.

## थाळीफेकपटू गगनदीपवर ३ वर्षांच्या बंदीची कारवाई

■ नवी दिल्ली

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत थाळीफेकचे सुवर्ण मिळविलेल्या गगनदीप सिंगसह अन्य काही ॲथलेट्सवर राष्ट्रीय उत्तेजकविरोधी एजन्सीने (नाडा) चारऐवजी ३ वर्षांची बंदी घातली. त्यांच्यावर डोपिंगचे आरोप झाल्यानंतर २० दिवसांच्या आत त्यांनी आपला गुन्हा मान्य केल्यानंतर त्यांच्या बंदी कालावधीत एका वर्षाची कपात करण्यात आली.

सेनादलाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गगनदीपने गेल्या फेब्रुवारीत उत्तराखंडमध्ये झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पुरुषांच्या थाळीफेकमध्ये ५५.०१ मीटरचे अंतर नोंदवत सुवर्णपदक पटकावले होते. नंतर तो उत्तेजक चाचणीत दोषी आढळल्याने त्याच्यावर तात्पुरत्या निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. नाडाने उत्तेजक चाचणीत दोषी आढळलेल्यावर केलेल्या ताज्या अपडेटनुसार गगनदीप सिंगच्या बंदीचा कालावधी एका वर्षाने कमी करण्यात आला. उत्तेजकविरोधी नियमातील कलमानुसार ही कपात करण्यात आली.

## बुची बाबू क्रिकेट स्पर्धा १८ ऑगस्टपासून सुरु होणार

■ चेन्नई

तामिळनाडू क्रिकेट असोसिएशनने आयोजित केलेली बुची बाबू क्रिकेट स्पर्धा १८ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत होणार आहे. तामिळनाडूमध्ये क्रिकेटचे जनक मानले जाणारे मोथावरापू वेंकट महिपती नायडू यांच्या नावावर असलेली बुची बाबू स्पर्धा पहिल्यांदा १९०९/१० मध्ये आयोजित करण्यात आली होती.

गेल्या हंगामात १२ वर्षांच्या मोठ्या खंडानंतर ही स्पर्धा पुन्हा खेळविण्यात आली आणि आता या हंगामात चौदा संघ या स्पर्धेत सहभागी होतील. यावेळी तामिळनाडूचे दोन संघ प्रेसिडेंट इलेव्हन आणि टीएनसीए इलेव्हन आहेत. दरम्यान या चौदा संघापैकी एक संघ मुंबईचादेखील आहे आणि यासाठी टीमची घोषणा करण्यात आली आहे. जाणून घेऊया संघात कोणाचा समावेश करण्यात आला. या स्पर्धेसाठी मुंबई संघाची घोषणा करण्यात आली आहे. १८ वर्षीय आयुष म्हात्रेला मुंबईचा कर्णधार बनवण्यात आले आहे.

## सुब्रतो फुटबॉल स्पर्धेला १९ ऑगस्टपासून सुरुवात

■ नवी दिल्ली

६४ व्या सुब्रतो चषक राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेला येथे मंगळवार १९ ऑगस्टपासून प्रारंभ होणार आहे. ही स्पर्धा ३ विविध गटांत खेळविली जाणार असून, त्यामध्ये एकूण १०६ संघांचा समावेश आहे. यामध्ये ४ आंतरराष्ट्रीय संघांचाही सहभाग यावेळी करण्यात आला आहे. या स्पर्धा १७ वर्षांखालील कनिष्ठ मुलांच्या, १७ वर्षांखालील कनिष्ठ मुलींच्या आणि १५ वर्षांखालील उपकनिष्ठ मुलांच्या विभागात घेण्यात येणार आहे.

या स्पर्धा सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटीने आयोजित केली असून, या स्पर्धेला एअरफोर्स स्पोर्ट्स मंडळाने पुरस्कृत केली. दिल्ली, बंगळूरु आणि एनसीआर येथे ही स्पर्धा भरविली जाणार असून, २५ सप्टेंबरपर्यंत स्पर्धेतील सामने खेळविले जातील. यावेळी लंका आणि नेपाळ देशातील आंतरराष्ट्रीय फुटबॉल संघांनाही निमंत्रित केले आहे. देशातील युवा फुटबॉलपटूंना अधिक प्रोत्साहन मिळण्याच्या हेतूने एअरमार्शल सुब्रतो मुखर्जी यांनी १९६० साली या स्पर्धेला प्रारंभ केला होता. दिल्ली येथे कनिष्ठ मुलींच्या १७ वर्षांखालील वयोगटातील स्पर्धेला १९ ऑगस्टपासून प्रारंभ होईल. १५ वर्षांखालील उपकनिष्ठ मुलांची ही स्पर्धा बंगळूरुमध्ये २ सप्टेंबर रोजी सुरू होईल तर कनिष्ठ मुलांच्या १७ वर्षांखालील वयोगटातील स्पर्धा दिल्ली एनसीआरमध्ये १६ सप्टेंबरपासून घेतली जाईल. दिल्ली एनसीआरमधील सामने डॉ. आंबेडकर स्टेडियम, तेजस फुटबॉल मैदान, सुब्रतो पार्क फुटबॉल मैदान,



पिंटु पार्क फुटबॉल मैदानावर होतील तर बंगळूरुमधील स्पर्धेतील सामने एअरफोर्स स्कूल जलहळ्ळी, एअरफोर्स यलहंका आणि हेडक्वॉर्टर्स ट्रेनिंग कमांड फुटबॉल मैदानावर आयोजित केले आहे.

## जुहू विलेपार्ले जिमखाना कॅरम स्पर्धा प्रशांत आणि समृद्धीला अग्रमानांकन

■ मुंबई

जुहू विलेपार्ले जिमखाना राज्य मानांकन कॅरम स्पर्धा १६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता जुहू विलेपार्ले, येथे सुरू होणार आहे. महाराष्ट्र कॅरम असोसिएशन आणि मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटना यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेत पुरुष एकेरी गटात २७२ आणि महिला एकेरी गटात ४० खेळाडूंनी भाग घेतला आहे. पुरुष एकेरी गटात मुंबईच्या विश्व विजेत्या प्रशांत मोरे तर महिला एकेरी गटात ठाण्याच्या समृद्धी घाडीगावकरला अग्रमानांकन देण्यात आले.

**पुरुष एकेरी :** १) प्रशांत मोरे (मुंबई), २) विकास धारिया (मुंबई ), ३) सागर वाघमारे (पुणे), ४) समीर महम्मद अंसारी (ठाणे), ५) रियाझ अकबर अली (रत्नागिरी), ६) प्रफुल मोरे (मुंबई), ७) राहुल सोळंकी (मुंबई), ८) अभिजित त्रिपनकर (पुणे)

**महिला एकेरी :** १) समृद्धी घाडिगावमर (ठाणे), २) आकांक्षा कदम (रत्नागिरी), ३) प्राजक्ता नारायणकर (मुंबई उपनगर), ४) मिताली पाठक (मुंबई), ५) अंबिका हरिथ (मुंबई ), ६) ऐशा साजिद खान (मुंबई), ७) निलम घोडके (मुंबई), ८) सोनाली कुमारी ( मुंबई )

## आशियाई रग्बी चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय महिला संघाला कांस्य

■ राजगीर

बिहारच्या राजगीरमध्ये झालेल्या आशियाई २० वर्षांखालील रग्बी चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतीय महिला संघाने कांस्यपदक पटकाविले. कांस्यपदकाच्या लढतीत भारताने उझबेकचा पराभव केला. या स्पर्धेमध्ये चीनने सुवर्णपदक आणि पुरुषांच्या गटात हाँगकाँगने सुवर्णपदक पटकाविले. या स्पर्धेत महिलांच्या गटात भारताच्या २० वर्षांखालील वयोगटातील खेळाडूंनी दर्जेदार कामगिरी केली. तिसऱ्या स्थानासाठी खेळविण्यात आलेल्या प्ले ऑफ सामन्यात भारताने उझबेकीस्तानचा १२-५ अशा फरकाने पराभव करत कांस्यपदक घेतले. भारतीय महिला संघाला चीनविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात चांगलेच झगडावे लागले. या सामन्यात चीनने भारतीय महिला संघाचा २८-७ असा पराभव केला.

## पाकिस्तानचा संघ ९२ धावांवर गारद! वेस्ट इंडिजने मालिका २-१ ने जिंकली

■ त्रिनिदाद

तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात वेस्ट इंडिजने पाकिस्तानचा २०२ धावांनी पराभव केला. या विजयासह संघाने ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका २-१ अशी जिंकली. वेस्ट इंडिजने ३४ वर्षांनंतर पाकिस्तानविरुद्ध एकदिवसीय मालिका जिंकली. यापूर्वी त्यांनी १९९१ मध्ये विजय मिळवला होता. विंडीजकडून शाई होपने नाबाद १२० धावा केल्या. शाई होपने त्याच्या कारकिर्दीतील १८ वे एकदिवसीय शतक




झळकावले त्रिनिदादमधील ब्रायन लारा स्टेडियमवर झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने ५० षटकांत ६ गडी गमावून २९४ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संपूर्ण संघ ९२ धावांवर ऑलआउट झाला. वेस्ट इंडिजकडून कर्णधार शाई होपने ९४ चेंडूत नाबाद १२० धावा केल्या. यात ५ षटकार आणि १० चौकारांचा समावेश होता. त्याच्या व्यतिरिक्त जस्टिन ग्रीव्हजने ४३*, एविन लुईसने ३७ आणि रोस्टन चेसने ३६ धावा केल्या. तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात शाई होपला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. जेडेन सील्सला मालिकावीर म्हणून निवडण्यात आले, त्याने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ३ आणि पहिल्या एकदिवसीय सामन्यात १ बळी घेतला. या मालिकेत त्याने एकूण १० बळी घेतले. डेन सील्सला मालिकावीर म्हणून घोषित करण्यात आले.

आपल्या अभिनय आणि सौंदर्याने एक काळ गाजवणाऱ्या प्रसिद्ध अभिनेत्री

# मुमताज



**६० आणि ७० च्या दशकात एकामागून एक हिट सिनेमे देणाऱ्या मुमताज यांचा एक्स्ट्रा ज्युनिअर आर्टिस्ट ते सुपर हिरोईनपर्यंत प्रवास केला. मुमताज यांनी बाल कलाकाराच्या रुपात आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर त्या हिंदी सिनेमांमध्ये एक्स्ट्रा ज्युनिअर आर्टिस्टच्या रुपात झळकल्या. सुरुवातीच्या काळात त्यांना नशीबाची साथ मिळाली नाही, म्हणून लो बजेट आणि बी ग्रेड सिनेमांमध्ये त्यांना काम करावे लागले.**

१९६५ हे वर्ष मुमताज यांच्या करिअरच्या दृष्टीने फार महत्त्वाचे ठरले. यावर्षी मुमताज यांचा 'ऐ मेरे सनम' हा सिनेमा रिलीज झाला होता. या सिनेमात त्यांनी साकारलेल्या नकारात्मक भूमिकेचे खूप कौतुक झाले होते. या नकारात्मक भूमिकेमुळे मुमताजच्या आयुष्यात सर्वकाही सकारात्मक होऊ लागले. बी ग्रेड सिनेमांमधली हिरोईनला आता ए ग्रेड सिनेमे मिळू लागले होते. 'पत्थर के सनम', 'राम और श्याम' आणि 'ब्रम्हचारी' या सिनेमांमध्ये त्यांनी सहायक अभिनेत्रीची भूमिका साकारली होती. 'दो रास्ते' या सिनेमातील हीरो होते सुपरस्टार राजेश खन्ना आणि त्यांच्या प्रेयसीच्या भूमिका मुमताज यांनी वठवली होती. हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरला आणि मुमताज एका रात्रीत बॉलिवूडच्या यशस्वी अभिनेत्रींमध्ये सामील झाल्या. या सिनेमाबरोबर मुमताजच्या यशाचा काळ सुरु झाला. यानंतर मुमताजे यांनी वळून बघितले नाही. 'आदमी और इन्सान', 'परदेसी', 'सच्चा-झुठा' या सिनेमांमुळे त्यांची गणती बॉलिवूडच्या यशस्वी अभिनेत्रींमध्ये होऊ लागली. १९७० साली रिलीज झालेल्या 'खिलौना' या सिनेमासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. मुमताज यांनी आपल्या फिल्मी करिअरमध्ये अनेक संस्मरणीय सिनेमे दिले. अधिकाधिक सिनेमांमध्ये त्यांनी प्रमुख भूमिका साकारली. के. बालाचंदर दिग्दर्शित आणि १९७४ मध्ये रिलीज झालेल्या 'आईना' या सिनेमात मुमताजच्या अभिनयाचा वेगळा पैलू बघायला मिळाला. समीक्षक आणि स्वतः मुमताज या सिनेमातील भूमिकेला सर्वोत्कृष्ट अभिनय समजते. फिरोज खान यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'अपराध', 'इंटरनॅशनल गँग', 'कॉनमॅन' या क्राईमवर आधारित सिनेमांमध्ये मुमताज यांनी खूप बोल्ड सीन दिले होते.या सिनेमांमध्ये त्यांनी टू पीस बिकिनी परिधान करुन सगळ्यांना आश्चर्यचकित केले होते. मुमताज यांच्यावर चित्रीत झालेले 'हमारे सिवा तुम्हारे और कितने दिवाने है...' हे गाणे खूप लोकप्रिय झाले होते. यशोशिखरावर असताना १९७४ मध्ये मुमताज व्यावसायिक मयुर माधवाणी यांच्यासोबत विवाहबद्ध झाल्या. लग्नगाठीत अडकल्यानंतर आपले प्रोफेशनल कमिटमेंट पूर्ण होईपर्यंत हिंदी सिनेमांमध्ये काम केले. २०१२ मध्ये भारतीय सिनेसृष्टीला शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मुमताज यांना इंटरनॅशनल इंडियन फिल्म अकादमीच्या वतीने सेकंड मोस्ट पॉप्युलर ब्युटी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सध्या मुमताज लंडन मध्ये वास्तव्याला आहेत. मुमताज यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा.

## बीडमध्ये गुन्हेगारांचे छायाचित्र लावल्यास गुन्हा दाखल होणार

■ बीड

**बीडमध्ये** होर्डिंगवर गुन्हेगारांचे छायाचित्र लावल्यास गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले आहेत. अलीकडेच शहरात आणि तालुक्यांत अनेक ठिकाणी गुन्हेगारांचे छायाचित्र असलेले बॅनर लावण्यात आले होते, ज्यावरून विरोधकांनी सरकारवर टीका केली होती.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडचे फोटो परळी आणि बीडमध्ये झळकले होते. तसेच सरपंच बापू आंधळे यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी बबन गित्तेचा वाढदिवस साजरा करण्यासाठी बॅनरवर फोटो लावण्यात आला होता. या संदर्भात संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी अशा होर्डिंगवर कारवाई करण्याची मागणी केली होती. या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हा प्रशासनाने आता स्पष्ट निर्देश दिले आहेत की, अनधिकृत होर्डिंग आढळल्यास नगरपरिषद किंवा पालिकेकडून तत्काळ कारवाई केली जाईल. तसेच कोणतेही होर्डिंग लावण्यापूर्वी मजकूर आणि फोटोची पडताळणी करणे बंधनकारक राहील.

## भुसावळ रेल्वे स्थानकावर एक्स्प्रेस गाड्या रखडल्या

■ जळगाव

**भुसावळ** रेल्वे स्थानकावर मनमाड आणि सुरत मार्गावरील गाड्या दोन तासांपासून रखडल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. गोरखपूर-लोकमान्य टिळक टर्मिनस काशी एक्सप्रेस, वास्को-द-गामा-हजरत निजामुद्दीन गोवा एक्स्प्रेस, छपरा-सुरत ताप्ती गंगा एक्स्प्रेस आणि भुसावळ-नंदुरबार पॅसेंजर या गाड्या रेल्वे स्थानकावर उभ्या होत्या.

भुसावळ-जळगाव महामार्गावरील रेल्वे पुलावर गर्डर टाकण्याच्या कामामुळे या गाड्या थांबवण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली. पुढील दोन ते तीन दिवस हे काम सुरू राहणार असून, दररोज दोन ते तीन तासांचा ब्लॉक घेतला जाईल अशी माहिती प्रशासनाने दिली.

## उरीमध्ये घुसखोरीचा प्रयत्न उधळला ! जवान शहीद

■ बारामुल्ला

**जम्मू** आणि काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात उरी सेक्टरमधील चुरुंदा भागात पहाटे सुमारे साडेतीन वाजताच्या सुमारास चकमक झाली. या भागात शत्रूकडून एलओसी नियंत्रण रेषेजवळ झालेल्या चकमकीत भारतीय लष्कराचा जवान शहीद झाला. परंतु लष्करी पथकाने घुसखोरीचा प्रयत्न यशस्वीपणे उधळून लावला. भारतीय लष्कर, सीआरपीएफ आणि जम्मू - काश्मीर पोलीस यांच्या संयुक्त पथकाने १ ऑगस्टपासून या भागात शोध आणि घेराबंदी मोहीम सुरू केली आहे. दहशतवाद्यांचा पळवाटेने पलायन थांबवण्यासाठी रुद्र हेलिकॉप्टर्स, ड्रोन आणि पॅरा कमांडो तैनात केले आहेत.

## पाकिस्तानसाठी हेरगिरी! डीआरडीओ गेस्ट हाऊस व्यवस्थापक अटकेत

■ जैसलमेर

**राजस्थानच्या** जैसलमेर येथील चंदन फील्ड फायरिंग रेंजजवळील डीआरडीओ (संरक्षण संशोधन आणि विकास संघटना) गेस्ट हाऊसचा कंत्राटी व्यवस्थापक महेंद्र प्रसाद याला पाकिस्तानच्या गुप्तचर संस्था आयएसआयसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी सीआयडी इंटेलिजन्सने अटक केली आहे. त्याच्यावर डीआरडीओ शास्त्रज्ञ व भारतीय लष्करी अधिकाऱ्यांच्या हालचालींसह शस्त्रास्त्र चाचण्यांशी संबंधित गोपनीय माहिती पाकिस्तानी हँडलर्सना पुरवल्याचा आरोप आहे.

गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी) च्या माहितीनुसार, उत्तराखंडमधील अल्मोरा येथील रहिवासी महेंद्र प्रसाद सोशल मीडियाद्वारे पाकिस्तानच्या गुप्तचर संस्थेशी संपर्कात होता. त्याने मिळवलेली माहिती मिसाइल आणि इतर शस्त्रास्त्र चाचण्यांसाठी फायरिंग रेंजवर येणाऱ्या अधिकाऱ्यांशी संबंधित होती. त्याच्या मोबाईल फोनच्या तपासणीतही याचे पुरावे मिळाले. १२ ऑगस्ट रोजी ऑफिशियल सिक्रेट्स ॲक्ट १९२३ अंतर्गत गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. सध्या तो सीआयडीच्या ताब्यात असून, पुढील तपासात त्याच्या संपर्कातील इतर संशयितांचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या उपाययोजनांवर पुनर्विचाराची गरज निर्माण झाली आहे.

## लातूरच्या मुरुड थांब्यासाठी १५ ऑगस्ट रोजी रेलरोको

■ लातूर

**लातूर** तालुक्यातील मुरुड या गावातील रेल्वेस्थानकावर प्रमुख रेल्वेगाड्यांना थांबा देण्यात यावा या मागणीसाठी गावकरी येत्या १५ ऑगस्ट रोजी रेलरोको आंदोलन करणार आहेत. मुरुड रेल्वे थांबा संघर्ष समितीच्या वतीने हे आंदोलन करण्यात येणार आहे. एक लाखांची लोकसंख्या असलेल्या या गावाला थांबा नसल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

संघर्ष समितीचे डॉ. हनुमान चांडक यांनी म्हटले की, मुरुड हे निजामकालीन रेल्वेस्थानक असून १९०५ पासून २००७ पर्यंत नॅरोगेज रेल्वे स्टेशन असताना मुरुडला प्रत्येक रेल्वे थांबत असे. मात्र २००८ पासून ब्रॉडगेज रेल्वे झाल्यानंतर मुरुडला रेल्वे स्टेशन दिले गेले नाही. या गावातून ब्रॉडगेज रेल्वे जाते. दिवसातून २० वेळा रेल्वेची ये-जा सुरु असते. मात्र या ठिकाणी एकही रेल्वे थांबत नाही. त्यामुळे १५ ऑगस्ट रोजी रेलरोको आंदोलन करून झेंडावंदन केलं जाणार आहे. या ठिकाणी १०० मीटरचा मोठा प्लॅटफॉर्मही आहे. मात्र व्यापारी गाव असलेल्या मुरुडला एकही रेल्वे थांबत नाही. २००८ पासून डीआरएम, सोलापूर यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करूनही दुर्लक्ष केले जात असल्यामुळे मुरुडचे नागरिक आता आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. येत्या १५ ऑगस्टला मुरुड रेल्वे थांबा संघर्ष समितीच्या वतीने हडपसर-हरंगुळ-लातूर रेल्वे रोखून रेल रोको आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच रेल्वे मोटरमनच्या हस्ते या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात येणार आहे.

## भटक्या कुत्र्यांच्या प्रकरणात सरन्यायाधीश लक्ष घालणार

■ नवी दिल्ली

**नवी दिल्ली** परिसरातील भटक्या कुत्र्यांना दिल्लीबाहेर काढण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर देशभर चर्चा सुरु झाली. या प्रकरणात आता आपण लक्ष घालणार असल्याचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयीतल वकिलांनी हे प्रकरण सरन्यायाधीशांसमोर मांडले आहे. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने ११ ऑगस्ट रोजी दिलेल्या निर्णयावर आक्षेप घेतला आहे. या आधी न्यायालयाने प्राणीमात्रांचा जगण्याचा हक्क मान्य केला होता. आताच हा निर्णय का बदलण्यात आला असे त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणी इतर न्यायमूर्तींनी आदेश दिले असून मी त्या प्रकरणात लक्ष देईन असे आश्वासन गवई यांनी या वकिलाला दिले. दिल्लीतील भटक्या कुत्र्यांना शहराबाहेरील शेल्टरमध्ये हलवण्याचे आदेश न्यायमूर्ती जेबी पारदीवाला व न्यायमूर्ती आर महादेवन यांनी दिले होते.

## १५७ वर्षांची भक्तीपर्वाची गर्जना! हरिनाम सप्ताह भेंडखळ गावात गाजला विठूरायाचा महागजर

■ उरण

**जय** जय रामकृष्ण हरी जय जय रामकृष्ण हरी टाळ-मृदंगाचा कडकडाट, भगव्या पताकांच्या लाटा आणि विठ्ठल नामाचा अखंड महासागर भेंडखळ गावाने यंदा श्री हरिनाम सप्ताहाच्या अविस्मरणीय १५७ वर्षांच्या परंपरेचा भक्तीमय जल्लोषात उत्सव साजरा केला जात आहे. श्रावण कृष्ण प्रतिपदेपासून गोपाळकाल्यापर्यंत गावातील प्रत्येक गल्लीत हरिनामाचा गजर घुमला. टाळ, मृदुंग, वीणा, अभंगवाणी आणि दिंडी मिरवणुकींनी भक्तीरसाचा महापूर उसळवला. महाराष्ट्राच्या आराध्य दैवत विठ्ठलाच्या कृपेने गावकऱ्यांनी पूर्वजांच्या अखंड वारशाची दिव्य परंपरा तशीच टिकवली आहे.

कृष्णजन्माष्टमीच्या रात्री मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेला. श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या मंगल क्षणी दहीहंडीच्या जल्लोषाने सोहळ्याने शिखर गाठले. वृद्ध ते तरुण अशा सर्व सप्तकऱ्यांनी कृष्णभक्तीच्या लाटेत स्वतःला झोकून देत असतात. या भक्तीसोहळ्याचे सर्व नियोजन व यशस्वी पार पाडण्याचे श्रेय काशीनाथ शिवराम ठाकूर, अशोक शंकर भोईर, उद्धव नामदेव घरत आणि गोपाळ जनार्दन ठाकूर यांना जाते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन, गावकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि भाविकांची अखंड नामसाधना यामुळे सप्ताहाला भव्यता लाभली. भाविकांच्या म्हणण्यानुसार, हा सोहळा बघण्याचा नाही अनुभवण्याचा आहे! सप्ताह संपल्यावरही टाळ, मृदुंग, वीणेचा नाद कानात घुमत राहतो, आणि ओठांवर आपसूक तुकोबांचे अभंग येतात हेचि दान देगा देवा, तुझा विसरण व्हावा भेंडखळकरांनी पुन्हा एकदा दाखवून दिले पांडुरंगाच्या नावातच खरी ऊर्जा, खरी प्रेरणा, आणि खरी महाराष्ट्राची ओळख आहे.

## राज्यातील १७ नवीन ग्रामपंचायतींना मंजुरी

■ खटाव

**राज्याचे** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास व पंचायतराज विभागाने राज्यात १७ नवीन ग्रामपंचायतींच्या निर्मितीला मंजुरी दिली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय राज्यपालांच्या आदेशाने राजपत्रात प्रकाशित करण्यात आले आहेत, अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

ग्रामविकासमंत्री गोरे यांनी सांगितले की, रत्नागिरी तालुक्यातील चिंद्रवली व उमरे, सोयगाव तालुक्यातील निंबायती व रामपुरा, बारामती तालुक्यातील ढाकाळे व खामगळवाडी, जुन्नर तालुक्यातील एडगाव व भोरवाडी, दौंड तालुक्यातील गार, बेटचीवाडी, मवीनगार, अंबड तालुक्यातील पाथरवाला बुद्रुक व कुरण तर बदनापूर तालुक्यातील हिवराराळा व हनुमान नगर, सावनेर तालुक्यातील पोटा व चनकापूर या गावांसाठी नवीन ग्रामपंचायत स्थापन करण्याचा निर्णय ग्रामविकास व पंचायतराज विभागाने घेतला आहे. या महसूली गावांचा समावेश असलेले स्थानिक क्षेत्र स्वतंत्र गाव असणार आहे. या नवीन १७ ग्रामपंचायतींच्या माध्यमातून या गावांची विकास प्रक्रिया अधिक गतीने होणार आहे.

## बदलापूरतील एमआयडीसी परिसरात वायू गळती

■ बदलपूर

**बदलापूर** शहरात मंगळवारी रात्री अचानक दाट धूर पसरल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली. विशेषतः पूर्व भागात मोठ्या प्रमाणात धुरकट वातावरण निर्माण झाले होते. स्थानिकांच्या मते, या भागातील केमिकल कंपन्यांनी हवेत वायू सोडल्यामुळे हा प्रकार घडला. बदलापूर एमआयडीसी परिसरातील काही रासायनिक कंपन्या रात्रीच्या वेळी वारंवार हवेत वायू सोडतात, ज्यामुळे परिसरातील रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो. मंगळवारी रात्री सुमारे १० वाजता अशाच प्रकारे मोठ्या प्रमाणात वायू हवेत सोडल्याने दृश्यमानता कमी झाली. वाहनचालकांना रस्त्यावर चालणे अवघड झाले, तर अनेक नागरिकांनी तोंडाला रुमाल बांधून स्वतःचा बचाव केला.

## म्हैसूरमध्ये पारंपरिक दसरा सवारीसाठी नऊ हत्तींच्या प्रशिक्षणाला सुरुवात

■ म्हैसूर

**म्हैसूरमधील** पारंपरिक हत्तींच्या दसरा सवारीसाठी काल आंतरराष्ट्रीय हत्ती दिनाचे औचित्य साधून सुरुवात करण्यात आली. दसरा सवारीमध्ये एकूण चौदा हत्तींचा सहभाग असणार आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात नऊ हत्तींची सराव फेरी काल काढण्यात आली. म्हैसूरच्या राजवाड्यापासून बलराम गेट, केआर सर्कल, सयाजी राव सर्कल आणि आयुर्वेद हॉस्पिटल सर्कल असा प्रवास करत हत्तींची ही मिरवणूक आरएमसी मार्केटपर्यंत गेली. काल सरावात सहभागी झालेले नऊ हत्ती अनुभवी आहेत. त्यांनी अनेकदा दसरा सवारीमध्ये भाग घेतला आहे. त्यामुळे माणसांची गर्दी आणि कोलाहल याने ते बिथरत नाहीत. आणखी पाच हत्ती लवकरच सरावामध्ये सहभागी होणार आहेत. या सर्व हत्तींना हवेत गोळीबार करून त्या आवाजाची सवय व्हावी असे प्रशिक्षण दिले जाणार आहे.



## भरधाव कारची ट्रकला धडक महिला डॉक्टर जागीच ठार

■ रायगड

**महाडहून** मुंबईच्या दिशेने चाललेल्या एका मालवाहू ट्रकला पाठीमागून येणाऱ्या भरधाव कारने जोरात धडक दिली. या भीषण अपघातात एक महिला डॉक्टर जागीच ठार झाली. तर त्यांचे सहकारी पुरुष डॉक्टर गंभीर जखमी झाले. हा भीषण अपघात माणगाव तालुक्यातील लाखपाले गावाजवळ घडला. या अपघातातील मृत महिला डॉक्टरचे नाव पल्लवी पळशीकर (३५) असे आहे, तर जखमी डॉक्टरचे नाव विशाल रमेश बडे (३०) असे आहे. डॉ.पल्लवी या लातूरच्या तर डॉ.विशाल बडे हे बीड जिल्ह्यातील अनपटवाडी पारगाव येथील रहिवासी आहेत. मुंबई- गोवा महामार्गावरून हे दोघे महाड येथून मुंबईकडे कारने चालले होते. त्यांची कार लाखपाले गावाजवळ येताच समोरील ट्रकवर धडकली.

## अनुकंपा तत्त्वावरील १३६ अर्जदारांना नियुक्तीपत्रे

■ मुंबई

**राज्य** मार्ग परिवहन महामंडळात अनुकंपा तत्त्वावर नोकरी साठी अर्ज केलेल्या १३६ उमेदवारांना आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे देण्यात आली. २०१६ पासून प्रलंबित असलेले सर्व प्रस्ताव निकाली काढण्यात आले असून अधिकाऱ्यांनी या प्रस्तावाबाबत संवदेनशील असावे असे आवाहन परिवहन मंत्र्यांनी यावेळी केले.

एसटी महामंडळात शासनाच्या धर्तीवर रा.प. सेवेत असताना अधिकारी, कर्मचारी मृत झाल्यास त्यांच्या कुटुंबातील एकाला अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याची तरतूद आहे. सन २०१६ पासूनचे अर्ज निकाली काढण्यात आले असून येत्या ३१ ऑगस्टपर्यंत इतर ६६ जणांना नियुक्तीपत्रे देण्यात येणार आहेत. एसटीच्या ६ व्या प्रादेशिक विभागाची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## उरण-पनवेलचा सुशिक्षित तरुण बेरोजगारीच्या भट्टीत सत्ताधारी-विरोधक नामकरणाच्या धुंदीत

■ उरण

**उरण-पनवेल** परिसरातील सुशिक्षित प्रकल्पग्रस्त तरुणांची बेरोजगारी दिवसेंदिवस विक्राळ रूप घेत आहे. खासगीकरणाच्या नावाखाली कामगार कपात, प्रकल्पांमधून स्थानिकांचा पत्ता पुसून परप्रांतीयांची मोठ्या प्रमाणावर भरती सुरू आहे. पदवी-डिग्री घेऊनही स्थानिक तरुणांना नोकरीची दारे बंद आहेत, आणि सत्ताधारी भाजप, शिंदे गटाची शिवसेना तसेच विरोधक राष्ट्रवादी, काँग्रेस-सर्वच पक्ष केवळ 'नामकरण'च्या धुंदीत असल्याची चर्चा जनतेत सुरू आहे. पूर्वी जेएनपीटी व अन्य प्रकल्पांत स्थानिकांची भक्कम उपस्थिती होती, ती आज हाताच्या बोटावर मोजण्याइतकी उरली आहे. कायद्याने प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याचा अधिकार असतानाही तो कागदावरच राहिला आहे. पालकांनी पोटाला चिमटा काढून मुलांना शिक्षण दिलं, पण नोकरीऐवजी वणवण भटकंतीच त्यांच्या नशिबी आली आहे. याउलट काही अनपढ लोक जास्त पगार कमावतात, ही वस्तुस्थिती उरण-पनवेलसाठी लाजिरवाणी आहे. जर सत्ताधारी आणि विरोधकांनी तातडीने स्थानिक प्रकल्पग्रस्त सुशिक्षितांना रोजगार मिळवून देण्यासाठी ठोस पावलं उचलली नाहीत, तर बेरोजगार तरुणांचा संताप रस्त्यावर उसळेल आणि मग 'नामकरण'चे फोटोसेशन सोडून नेत्यांना उत्तर द्यावं लागेल. बेरोजगारीचा ज्वालामुखी फुटण्यापूर्वी सत्ताधाऱ्यांनी जागं व्हावे अशी चर्चा जनतेत सुरू आहे.

## गणेशोत्सवासाठी मोदी एक्स्प्रेसच्या दोन मोफत गाड्या धावणार

■ मुंबई

**गणेशोत्सवाच्या** पार्श्वभूमीवर मुंबईतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही मोदी एक्स्प्रेस ही मोफत विशेष रेल्वेसेवा आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमाचे हे सलग १३ वे वर्ष असून, यंदा कोकणवासीयांच्या सेवेसाठी एक नव्हे तर दोन विशेष गाड्या धावणार आहेत. कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी या दोन गाड्या वेगवेगळ्या दिवशी सोडण्यात येणार आहेत. तिकीट वाटप सोमवार, १८ ऑगस्ट २०२५ पासून सुरू होईल. पहिली रेल्वेगाडी शनिवार,




२३ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता दादर स्थानकातून सुटेल. रत्नागिरी आणि कुडाळ येथे थांबत ही गाडी सावंतवाडीपर्यंत धावेल. दुसरी गाडी रविवार, २४ ऑगस्ट रोजी सुटणार आहे. दोन्ही गाड्यांतील सर्व प्रवाशांसाठी मोफत जेवण आणि पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात येणार आहे.

## चंद्रपूरच्या शासकीय आश्रमशाळेत ९ विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा

■ चंद्रपूर

**चंद्रपूरच्या** चिमूर तालुक्यातील जांभुळघाट येथील आदिवासी शासकीय आश्रमशाळेतील ९ विद्यार्थ्यांना जेवणातून विषबाधा झाली. चिमूर एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालयामार्फत चालवली जाणारी ही आश्रमशाळा एकूण ५३८ विद्यार्थ्यांची असून, प्रकृती खालावलेल्या विद्यार्थ्यांना चिमूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

विद्यार्थ्यांना रक्ताच्या उलट्या आणि चक्कर येणे अशी लक्षणे दिसू लागली. आदिवासी संघर्ष समितीच्या सदस्यांनी शाळेत जाऊन चौकशी केली असता विद्यार्थ्यांना शिळे अन्न दिल्याची प्राथमिक माहिती मिळाली. दरम्यान, विद्यार्थ्यांना नेमका कशामुळे त्रास झाला याचा शोध घेतला जात असून, वैद्यकीय तपासणी करण्यात आली असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाने दिली आहे.

# शोले तील 'महबूबा महबूबा' हे गाणे आर.डी. बर्मनना का गावे लागले?

**उद्या शोले या अजरामर चित्रपटाच्या प्रदर्शनाला पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत. संगीतकार राहुल देव बर्म उर्फ पंचम,- आर.डी. बर्मन यांनी संगीतबध्द केलेली या चित्रपटामधील सर्वच गाणी लोकप्रिय ठरली. 'होली के दिन,' कोई हसीना जब रूठ जाती है 'ये दोस्ती हम नहीं तोड़ेंगे' 'हाँ जब तक है जाँ,' 'महबूबा महबूबा'. परंतु 'महबूबा महबूबा' या गाण्याने सर्वाधिक लोकप्रियता मिळवली. चित्रपटाचे संगीतकार आर.डी. बर्मन यांनी स्वतः हे गाणे गायले आहे. परंतु सुरुवातीला हे गाणे किशोर कुमार यांच्या आवाजात रेकॉर्ड करायचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला होता. मग असे असताना हे गाणे पंचम उर्फ राहुल देव बर्मन यांच्या झोळीत कसे पडले? याचा एक मजेदार व रंजक किस्सा आहे.**






झालं असं की राहुल देव बर्मन यांचे मामा श्री. निर्मल कुमार दासगुप्ता आपल्या बहिणीला, म्हणजे राहुल देव बर्मन यांची आई श्रीमती मीरा देव बर्मनना भेटण्यासाठी मुंबईला आले होते. पंचम आणि त्यांच्या मामामध्ये खूप प्रेम होते. बंगाली लोकांमध्ये प्रत्येक पुरुष-स्त्रीचे घरातील एक लाडाने हाक मारायचे नाव असते. पंचम आपल्या मामाला 'मोनी दादू' असे संबोधित असत, तर मामा आपल्या या भाच्याला 'टुबलू' म्हणत असत.

निर्मल मामा मार्च १९७५ मध्ये मुंबईला आले होते. त्यावेळी 'शोले' च्या गाण्याचे रेकॉर्डिंग सुरू होते. एका संध्याकाळी पंचम एका गाण्याचे स्क्रॅच रेकॉर्ड केलेली कॅसेट घरी घेऊन आले. ते गाणे आपल्या मामाला ऐकवण्याची त्यांना उत्सुकता होती. आईकडून त्यांना कळले की मामा गच्चीवर बसून चहा पित आहेत. पंचम लगेच टेपरेकॉर्डर आणि कॅसेट असा सारा तामझाम घेऊन गच्चीवर गेले आणि त्यांनी आपल्या मोनी दादूला ते स्क्रॅच ऐकवले. ते गाणे होते 'महबूबा महबूबा'. त्याकाळात कुठलेही स्क्रॅच रेकॉर्डिंग एखाद्या नव्या गायक-गायिकेकडून किंवा लहान-मोठे संगीताचे कार्यक्रम करणार्या गायकांच्या आवाजात रेकॉर्ड केले जात असे आणि रेकॉर्डिंग करण्यापूर्वी गाण्याचे बोल व चाल ऐकण्यासाठी ते मुख्य गायकांकडे पाठवले जात असे. त्यानंतर त्या गाण्याचे फायनल रेकॉर्डिंग केले जाई. त्यामुळेच किशोर कुमार यांच्या आवाजात रेकॉर्ड होणारे 'महबूबा महबूबा' चे स्क्रॅच पंचमदांनी आपल्या आवाजात रेकॉर्ड केले होते.

पंचमदांच्या आवाजातील ते गाणे मामा ऐकले, ताबडतोब ते आपल्या लाडक्या भाच्याला म्हणाले, 'अरे, हे गाणे तर तुझ्या आवाजात खूप छान वाटत आहे. किशोर कुमारकडून गाऊन घ्यायची काय गरज आहे?'

परंतु राहुल देव बर्मन यांनी आपल्या मामाच्या बोलण्याकडे फारसे लक्ष दिले नाही. त्यांना फक्त मामाला गाण्याची चाल ऐकवायची होती. त्यामुळे मामाच्या या बोलण्यावर हसत त्यांनी त्यांचे बोलणे बाजूला केले. हे संभाषण, ही घटना इथेच संपली.

त्यानंतर काही दिवसांनी गाण्याच्या फायनल रेकॉर्डिंगचा दिवस उजाडला. परंतु काही कारणामुळे किशोर कुमार वेळेवर स्टुडिओमध्ये पोहचू शकले नाहीत. रेकॉर्डिंगची सर्व तयारी झाली होती. सर्व वादक स्टुडिओमध्ये हजर झाले होते.

त्यामुळे रेकॉर्डिंग रद्द करणे शक्य नव्हते. वादकांची संघटना ही भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात मजबूत संघटना मानली जाते. संगीतकार सोडाच, पण एखाद्या वादकाचे पैसे जरी निर्माता-संगीतकाराने बुडवले तरी त्या निर्मात्याचा चित्रपट आणि त्यातील गाणी प्रदर्शित होऊ शकत नाहीत. त्यामुळे किशोर कुमार न आल्यामुळे रेकॉर्डिंग झाले नाही, तरी उपस्थित वादकांना त्यांचे मानधन द्यावेच लागते. स्टुडिओचे पैसे देखील देणे भाग होते. यामुळे निर्माता जी.पी. सिप्पींचे नुकसान होणार होते. मग किशोर कुमार यांची फार वाट न पाहता राहुल देव बर्मन यांनी स्वतःच्याच आवाजात ते गाणे रेकॉर्ड केले. त्यांच्या आवाजातील 'महबूबा महबूबा' ऐकून दिग्दर्शक रमेश सिप्पींनी आनंदाने उडी मारली.

पंचम, हे गाणे तुझ्याच आवाजात ठेवायचे, त्यांनी तिथेच निर्णय घेतला. हे बघ, 'महबूबा महबूबा' हे गाणे मी कुठल्या नायकावर चित्रित करणार नाही तर पाहुणा कलाकार असलेल्या जलाल आगावर चित्रित होणार आहे. त्यामुळे हे गीत किशोर कुमारच्या आवाजात गाणे रेकॉर्ड केलेच पाहिजे असं काही नाही. उलटपक्षी तुझ्याच आवाजात ते प्रभावी वाटत आहे. रमेश सिप्पी यांचे हे बोलणे ऐकून राहुल देव बर्मनना आपल्या मामाच्या बोलण्याची आठवण झाली.

मेहबूबा पंचमच्या आवाजात ऐकल्यावर किशोर कुमार यांनी देखील मोठ्या मनाने कबूल केले की, पंचम ज्या पद्धतीने हे गाणे गायला आहे, आपल्याला तसे गाता आले नसते. 'महबूबा महबूबा' या गाण्याच्या चालीबद्दल सांगायचे तर, ही राहुल देव बर्मन यांची स्वतः निर्माण केलेली चाल नाही. ग्रीक गायक डेमिस रूसोस यांच्या से यू लव्ह मी (Say You Love Me) या गाण्यावर बेतलेली आहे. डेमिसचे हे गाणे १९७४ साली प्रदर्शित झाले होते. मजेची गोष्ट म्हणजे, डेमिस रुसोसची देखील ही स्वतःची चाल नसून, ग्रीक गायक मिहालिस व्हिओलारिसने १९७३ मध्ये गायलेले ता रालिया (ta realia) वरून घेतली आहे. 'ता रालिया' से यू लव्ह मी, आणि 'महबूबा महबूबा' ही तिन्ही गाणी प्रचंड लोकप्रिय झाली.

राहुल देव बर्मन आणि संतूर सम्राट पंडित शिवकुमार शर्मा यांची खूप जिगरी मैत्री होती, त्यामुळे पंडितजींनी पंचम यांच्या अनेक गाण्यांमध्ये संतूर वाजवली आहे. शोले चं हे गीत देखील त्यापैकी एक आहे. परंतु या गाण्यामध्ये त्यांनी भारतीय संतूर नव्हे तर इराणी संतूर वाजवली आहे. पंडित शिवकुमार शर्मा १९६९ साली इराणच्या शिराझ फेस्टिवलमध्ये वादन सादर करण्यासाठी गेले असताना, तिथल्या एका इराणी व्यक्तीने त्यांना ती संतूर भेट दिली होती.



## झुंजणारी कोंबडी?



अभिनेत्री आणि सांसद जया बच्चन यांचा रागीट स्वभाव आणि सार्वजनिक ठिकाणी लोकांवर रागावणे, अपशब्द बोलणे, तसेच मीडिया कर्मचार्यांचा अपमान करणे ही गोष्ट काही नवी नाही. केवळ अमिताभ बच्चन सारख्या मोठ्या आणि नेहमी नम्र वागणार्या स्टारची पत्नी म्हणून मीडिया कर्मचारी जया बच्चन करीत असलेला अपमान सहन करत असतात. मात्र दोन दिवसांपूर्वी जया बच्चन यांनी शिष्टाचाराच्या सर्व सीमा तोडल्या आणि असे काही वर्तन केले की, त्यांचा तो व्हिडिओ गेल्या एक-दोन दिवसांपासून सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये दिसते की, कॉन्स्टिट्यूशन क्लबच्या बाहेर जया बच्चन रागाने एका माणसाला धक्का देत आहेत. सदर व्यक्ती जया बच्चन यांच्यासह सेल्फी काढू इच्छित होता. हे पाहून जया बच्चनना राग अनावर झाला. त्यांनी त्या माणसाला धक्का देत सांगितले की, तू काय करत आहेस? हे काय आहे? या घटनेवर आता भाजपा खासदार आणि अभिनेत्री कंगना रणौतने आपला संताप व्यक्त करत जया बच्चनवर टीका केली आहे. कंगनाने केलेली टीका देखील व्हायरल होत आहे. कंगनाने जया बच्चन यांचा हा व्हिडिओ आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर शेअर करत त्याखाली लिहिले आहे की, या एक चिडखोर आणि विशेषाधिकारप्राप्त महिला आहेत. त्यांचे नखरे आणि विवेकशून्यता, मूर्खपणा लोक यासाठी सहन करतात कारण त्या अमिताभ बच्चन यांच्या पत्नी आहेत. समाजवादी पार्टीची टोपी कोंबडीच्या तुऱ्या सारखी डोक्यावर दिसत आहे. त्यांचे हे वर्तन लाजिरवाणे आहे. यापूर्वीही २०२० मध्ये कंगना रणौतने जया बच्चनवर टीका केली होती. त्यावेळी तिने चित्रपटसृष्टीला गटार म्हटले होते, म्हणून जया बच्चन यांनी कंगनावर टीका केली होती.यावर खुलासा करत कंगनाने एक्सवर लिहिले होते की, जया जी, माझ्या जागी तुमची मुलगी श्वेता असती, लहानपणी तिचे कुणी लैंगिक छळ केले असते किंवा तुमचा मुलगा अभिषेक बच्चनला त्रास दिला असता, तर तुम्ही तेव्हा सुध्दा असेच म्हणाले असता का? आमच्यावर दया करा.

## तर आजचे हिंदू तुम्हाला माफ करणार नाहीत

**दिग्दर्शक** नितेश तिवारी यांचा 'रामायण' चा पहिला भाग पूर्ण झाला असून दुसऱ्या भागाची तयारी सुरू आहे. या चित्रपटात रणबीर कपूर, सनी देओल, साई पल्लवी आणि यश यासारखे मोठे स्टार्स काम करत आहेत. महाभारत या लोकप्रिय सिरीयलमध्ये भीष्म पितामहची भूमिका साकार करणारे ज्येष्ठ अभिनेता मुकेश खन्ना यांना शक्तीमान या मालिकेमुळे देखील खूप लोकप्रियता मिळाली होती. त्यांनी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीदरम्यान रणबीर कपूरच्या निवडीबाबत तसेच रामायण या सिनेमाबद्दल, त्याच्या भरमसाठ बजेटविषयी आपली मते मांडली आहेत. काय म्हणाले मुकेश खन्ना? मुकेश खन्ना यांनी मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाची भूमिका करणाऱ्या रणबीर कपूरच्या अभिनय क्षमतेविषयी शंका निर्माण करत सांगितले की, त्याच्या आधीच्या काही भूमिकांमुळे रणबीरची 'ॲनिमल' ची प्रतिमा तयार झाली आहे. तो रामाची भूमिका करत असल्याबद्दल मला काही समस्या




नाही, परंतु जर तुम्ही रामाला एका योद्ध्याच्या रूपात दाखवणार असाल तर प्रेक्षक ते स्वीकारणार नाहीत. रामाने अतिशय संयमाने आणि विनम्रपणाने आपला १४ वर्षांचा वनवास स्वीकारला, शबरीने दिलेली उष्टी बोरं खाल्ली आणि धनुषबाणाचा वापर करत युद्ध केले नव्हते. मुकेश खन्ना यांनी चित्रपटाच्या निर्मितीविषयी देखील आपले मत मांडले. त्यांनी सांगितले की, रामायणपेक्षा मोठा कुठला विषय असू शकत नाही. परंतु मी बघितले आहे की, 'आदिपुरुष' ची निर्मिती किती खराब पद्धतीने करण्यात आली होती. जर तसेच काही बनवले गेले तर आजचे हिंदू तुम्हाला माफ करणार नाहीत. रामायण १ हजार कोटीच्या बजेटमध्ये बनू शकत नाही.


## ती स्वत:ला विवाहित स्त्री मानत असे...



ज्येष्ठ अभिनेत्री रेखा आणि अमिताभ बच्चन यांच्या अनेक प्रेमकथा ऐकायला मिळत असतात. रेखा अनेक वर्षांपासून महानायक अमिताभ बच्चन यांना पसंत करतात, हे सर्वश्रुत आहे. एके काळी त्यांची छुपे नातेसंबंध असल्याचे म्हटले जाते. रेखाचा उमराव जान हा लोकप्रिय चित्रपट नुकताच पुनर्प्रदर्शित झाला होता. त्यानिमित्ताने रेखा आणि या चित्रपटाचे दिग्दर्शक मुजफ्फर अली यांनी एक समारंभ देखील आयोजित केला होता. मुजफ्फर अली यांनी एका पुस्तकामध्ये अमिताभ बच्चन आणि रेखा यांच्या तथाकथित संबंधांविषयी मनमोकळेपणाने आपली मते मांडली आहेत. त्यांनी सांगितले आहे की, रेखा ही अतिशय संवेदनशील महिला आहे. उमराव जानचे शूटिंग दिल्लीमध्ये सुरू असताना अमिताभ बच्चन उमराव जानच्या सेटवर येऊन बसत असत. यामध्ये सत्यता आहे.

जेव्हा अमिताभ बच्चन यांचा उल्लेख होत असे, तेव्हा रेखा नेहमी 'इनको, इन्होंने' (ते, त्यांनी ) असे म्हणत असे, ज्याप्रमाणे विवाहित महिला आपल्या पतीचे नाव न घेता त्याच्याविषयी बोलत असतात. मला वाटते की, ती स्वतःला विवाहित स्त्री मानत असे. मुजफ्फर अली यांनी हे देखील सांगितले आहे की, रेखा प्रेम करत होती अमिताभवर. अमिताभना त्यांच्या या प्रेमाला एक नाव द्यायला हवे होते. अमिताभना रेखाशी लग्न करायला हवे होते. अमिताभ बच्चन यांनी १९७३ साली जया भादुरीशी विवाह केला होता. ८०च्या दशकात जेव्हा अमिताभ आणि रेखा यांच्या प्रेमसंबंधांच्या अफवा पसरू लागल्या, तेव्हा दिग्दर्शक यश चोप्रा यांनी आपल्या सिलसिला या चित्रपटाच्या संदर्भात बीबीसीला मुलाखत देताना अमिताभ-रेखा यांच्या प्रेमसंबंधावर आपले स्पष्ट मत मांडले होते. त्यांनी सांगितले होते की, चित्रपट बनवत असताना मी काळजीत होतो. कारण वास्तविक जीवन पडद्यावर येणार आहे. जया त्याची पत्नी आहे आणि रेखा प्रेयसी आहे. सारखीच कथा पडद्यावर दिसणार आहे.

## या वीकेण्डला बघा छावा




**१५ ऑगस्ट रोजी असलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने या वीकेंडला छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय शौर्याची साक्ष देणारा 'छावा' या ब्लॉकबस्टर ऐतिहासिक चित्रपटाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर येत्या रविवारी, १७ ऑगस्ट रोजी रात्री ८ वाजता स्टार गोल्ड वाहिनीवर प्रसारित होणार आहे. पहिल्यांदाच स्टार गोल्ड वाहिनीवर प्रेक्षकांना 'छावा' मराठीत आणि हिंदीत पाहता येणार आहे. निवडक ऑपरेटरद्वारे हा चित्रपट आता मराठीमध्ये घरबसल्या प्रेक्षकांना पाहता येणार असून, या सिनेमाव्दारे छत्रपती संभाजी महाराज यांची शौर्यकथा त्यांच्या मातृभाषेत घरोघरी पोहोचणार आहे. 'छावा' चे दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केले असून, अभिनेता विकी कौशल यांनी छत्रपती संभाजी महाराजांची व्यक्तिरेखा साकार केली असून रश्मिका मंदाना महाराणी येसूबाई यांची भूमिका केली आहे आणि दमदार अभिनेता अक्षय खन्नाने औरंगजेबची भूमिका निभावली आहे. या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरच्या निमित्ताने विकी कौशलने सांगितले की, 'छावा' हा सिनेमा आता मराठीत देखील (निवडक ऑपरेटरवर) दिसणार आहे, ही माझ्यासाठी तसेच सर्व मराठी भाषिकांसाठी मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे. छत्रपती संभाजी महाराज यांची कथा पडद्यावर साकार करणे हा माझ्या कारकिर्दीतील सर्वात मोठा सन्मान आहे.**


## शाहरुखच्या चित्रपटाची कॉपी आहे 'परम सुंदरी'?

अभिनेत्री जान्हवी कपूर आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांची जोडी असलेल्या 'परम सुंदरी' या सिनेमातील दोन गाणी 'परदेसिया' आणि 'भीगी साडी' प्रदर्शित झाली आहेत. हा चित्रपट दोन आठवड्यांपूर्वी प्रदर्शित होणार होता; परंतु काही कारणांमुळे या चित्रपटाचे प्रदर्शन पुढे ढकलण्यात आले. आता या चित्रपटाचा एक मजेदार ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे, ज्यात सिद्धार्थ मल्होत्रा आणि जान्हवी कपूर यांची केमिस्ट्री युजर्सना पसंत पडत आहे. ट्रेलरची सुरुवात दिल्लीच्या मुलगा परम सचदेव म्हणजे सिद्धार्थ मल्होत्रा केरळच्या नृत्यांगना सुंदरीसह फ्लर्ट करताना होते. सुंदरी कुठल्यातरी गेस्ट हाऊसची मालकीण आहे, ज्यामध्ये परम आपल्या मित्रासह राहायला आला आहे. परम आपल्या अडचणी सुंदरीला सांगतो, तेव्हा सुंदरी स्पष्टपणे त्याला सांगते



की, ती त्याची कुठलीही समस्या सोडवू शकणार नाही. मग त्यांच्यामध्ये प्रेम होते; परंतु चित्रपटाची कथा इतकीच नाही, तर त्यांच्या प्रेमामध्ये अनेक समस्या निर्माण होतात. ट्रेलरच्या शेवटी सुंदरीकडून परमला मद्रासी लोकांविषयी ज्ञान दिले जाते. ती म्हणते की, तमिळ, तेलुगू आणि मल्याळी यामध्ये काय अंतर आहे हे उत्तर भारताकडील माणसे समजू शकत नाहीत. परमसुंदरीचा हा ट्रेलर बघून तुम्हाला शाहरुख खान आणि दीपिका पदुकोण यांच्या 'चेन्नई एक्सप्रेस' ची नक्कीच आठवण येईल. हा चित्रपट आता २९ ऑगस्टला प्रदर्शित होत आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१३४२



**आडवे शब्द –**

१. घाम २. रिकामा वेळ, फुरसत ५. मृत्यूदेवता, यम ७. चिकित्सक वृत्तीचा ९. चौकशी १०. गलथान, बेशिस्त ११. गगन १३. नारळाची करवंटी १५. सामूहिक निषेध १७. लिंबाची मोठ्या आकाराची जात १९. संपूर्ण, अख्खा २०. पाणी २१. प्रेरित झालेला २२. लांडगा २४. ताकद २६. घर २७. कुंजर, गज २८. लिहितावाचता येणे ३०. वरिष्ठांना दिलेली भेटवस्तू ३२. घाव, हल्ला ३४. दूध ३५. दुष्यंत आणि शकुंतलेचा पुत्र ३७. फसवणारा, लुच्चा ३८. पुढ्यात, समोर ३९. यज्ञासाठीचा ओटा, चबुतरा ४०. बैठ्या खेळातली सोंगटी ४३. फुलांचा गजरा ४५. फोडणीतला एक घटक, हरिद्रा ४६. घशाला पडलेली कोरड ४७. उपरोधिक, खोचक ४९. मोहरी, राई ५०. कामाचा करार, कंत्राट ५२. पायांच्या अंगठ्यातले तांब्याचे वळे ५३. जवळ, समीप ५५. चेहरा, मुख ५७. क्षमता, आवाका ५८. हात राखून केलेला खर्च ६१. धोशा, लकडा ६३. अवास्तव; वात्रट ६५. जुन्या रुपयातले दोन आण्यांचे नाणे ६७. पिशाच्च, दुष्ट व्यक्ती ७०. उद्दिष्ट, साध्य ७१. अयशस्वी ७३. अति कृपण, खाष्ट ७४. नको तिथे नाक खुपसणारा ७५. मुलगी ७८. पृष्ठ, पर्ण ७९. प्रेयसी ८०. गावचा तलाठी ८१. लांब अंतरावर ८२. पूजेतील तांब्या ८५. रडणे, अश्रू ढाळणे ८८. मोठे भांडे ८९. थेट, त्वरित ९१. जंगली, वन्य ९३. कापडाचा तुकडा ९४. शेराचा सोळावा भाग ९६. नाशवंत ९७. रानातील दिशाभूल ९९. फेटा १०१. भगवे वस्त्र १०३. फळीला किंवा तुळईला आधारासाठी उभा केलेला लहान खुंट १०४. सामूहिक आक्रोश १०५. फुलातील रजकण १०६. मक्षिका १०७. जगबुडी

**उभे शब्द –**

१. नियोजित मुदत पूर्ण होण्याआधी स्वखुशीने घेतलेली निवृत्ती २. आळंदीचा पवित्र वृक्ष ३. लोकनाट्य, तमाशा ४. धातूची कांब ५. हडकुळा, सडपातळ ६. किल्ल्याभोवतीची संरक्षक भिंत ७. नऊवारीबरोरचे वस्त्र ८. दही आणि भात १०. मूळव्याध ११. मिठी १२. नियंत्रण, कब्जा १४. ठार करणे १६. तीन मुखांचा देव १८. भीती, धास्ती २०. पोट २१. विनोदी नाटक २३. हत्तीचे पिल्लू २५. खोल्यांची रांग, छावणी २६. आश्रय, आधार २८. मलई २९. जहाजातून आयात केलेला माल ३१. अन्ननलिकेच्या खालचा अवयव ३२. आनंद, मुलांचे एक नाव ३३. महादेवाचे वाहन ३४. हुद्दा, पाऊल, कवन ३६. सरोवर ३८. प्रामाणिक ३९. पोशाख ४१. कालव्याचे किंवा पाटाचे पाणी आत घेऊन बांधलेला हौद किंवा कृत्रिम विहीर ४२. नगर, पुर ४४. विनासायास, अनायासे ४५. गहाळ होणे ४६. दुःखात बुडालेला ४७. भांडण ४८. चकाकी ५१. गाण्यातले कडवे ५३. पुरुष ५४. नात्यातला कडवटपणा ५६. व्यापारातील फायदा ५९. शेकडा प्रमाण ६०. सर्वत्र घडणारे, आढळणारे ६२. चिंतन ६४. पलाण, खोगीर ६५. रास ६६. सहजासहजी ६७. ढगाळ, ढिला ६८. नजरबंदीची जादू ६९. भाकरीचे एक धान्य ७१. पादत्राणे नसलेला ७२. सरशी ७४. जेवणाचे दालन, डायनिंग हॉल ७६. मगरीचे अश्रू, रडण्याचे ढोंग ७७. पाण्याचा कालवा ७८. लोका सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः xxx xxx ८०. अधोगती ८३. शंभर ८४. श्वापदाचे पंजे ८५. डोळ्यांना न दिसणारे ८६. अंत, मर्यादा ८७. अगोदर ९०. कुत्रा ९२. हातशिलाईतील टाक्याचा प्रकार ९३. राजस्थानात आढळणारी हरणांची एक जात ९५. पागोट्यावरून गुंडाळलेले वस्त्र ९८. सुळका १००. छत १०१. कावळा १०२. ब्राह्मण •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३४१चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. धाक ३. अस्त ४. पाककला ७. नाकबूल ११. मथितार्थ १२. दरवळ १३. पातेले १४. वज्र १५. शूर्पणखा १६. वहाण १७. वरणफळे २०. मान्य २१. आळा २२. वखार २५. बुलंद २६. आटवल २८. वठार २९. पडता काळ ३०. करुणा ३२. दयनिय ३४. टवाळ ३७. धन ४०. काव ४१. हजारो ४२. जानू ४३. भरभराट ४५. वृद्धापकाळ ४७. समा ४८. रास्त ४९. राजी ५०. गळ ५१. मेष ५२. शेज ५३. माजी ५४. चेव ५६. भलावण ५७. मुख ५९. वळू ६०. वधू ६२. तीनतेरा ६४. खवचट ६७. सख्य ६८. मदनबाण ७१. खल ७२. अनुचर ७४. लाखो ७६. कंदर्प ७७. भोवती ७८. मजाल ८०. पादप ८२. सरडा ८४. पार ८५. बिनधास्त ८६. पद्य ८६अ. गळ ८७. नवरात्र ८९. टाच ९०. डौलदार ९२. ठप्प ९३. ताठा ९५. लढा ९७. पेर ९८. दमट १०२. झुणका १०३. मल्ल १०४. लगेच १०५. लीला १०६. नवागत

**उभे शब्द :** १. धाम २. कथिल ३. अर्थशून्य ४. पारखा ५. कव ६. कळवळा ७. नाते ८. कलेवर ९. लवण १०. पोवळे १२. दणकट १३. पाणवठा १८. फडताळ १९. अंबुज २०. मादक २१. आलय २३. खारट २४. दळणवळण २६. आणा २७. वदन २८. वय २९. पळ ३१. रुक्ष ३३. नीहार ३५. वाणी ३६. रुजामा ३७. धनू ३८. फराळ ३९. गद्धा ४०. काका ४१. हसतमुख ४२. जास्त ४३. भजी ४४. भगवती ४५. वृषभ ४६. परिवर्तन ४८. राजवट ४९. राजीव ५५. मातेरे ५८. खवखव ६१. धूसर ६३. मण ६५. चलती ६६. अनुजा ६८. मद ६९. दर्प ७०. बाजारगप्प ७२. अमर ७३. चलबिचल ७५. खोपा ७६. कंप ७७. भोजन ७९. विधान ८१. दलाल ८३. डाळ ८४. पात्रता ८६. परम ८८. वळण ९०. डौर ९१. दादला ९४. ठाम ९६. ढाल ९७. पेच ९९. टन १००. श्रुत

# निवडणूक आयोगाला चपराक! कोर्टाने सर्व ईव्हीएम तपासले

पान १ वरून

मतमोजणी करण्याचे आदेश दिले. न्यायालयाच्या या आदेशाला विजयी उमेदवार कुलदीप सिंग यांनी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाने कुलदीप सिंग यांच्या बाजूने निर्णय देत कनिष्ठ न्यायालयाचा निकाल रद्द केला. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला मोहित कुमार यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. न्या. सूर्यकांत, न्या. दिपांकर दत्ता आणि न्या. एन कोटिश्वर सिंह यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयाने असे आदेश दिले की, पानिपतचे पोलीस उपायुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी संबंधित निवडणुकीसाठी वापरण्यात आलेली सर्व ईव्हीएम यंत्रे न्यायालयाच्या रजिस्ट्रारसमोर सादर करावी. ज्या बुथबद्दल तक्रार आहे त्या बुथसह सर्व बुथवरील ईव्हीएम यंत्रांमधील मतांची फेरमोजणी करावी. या फेरमोजणीच्या वेळी न्यायालयाचे रजिस्ट्रार, याचिकाकर्ते आणि बचाव पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित असावे.

न्यायालयाच्या या आदेशावर अंमलबजावणी करत ६ ऑगस्ट रोजी सर्व संबंधितांच्या समक्ष बूथ क्रमांक ६५ ते ७० मधील ईव्हीएम यंत्रांमधील मतांची फेरमोजणी करण्यात आली. फेरमोजणीची मागणी करणारे याचिकाकर्ते मोहित कुमार यांना १ हजार ५१ मते मिळाली. तर विजयी उमेदवार कुलदीप सिंह यांना १ हजार मते मिळाली. म्हणजेच मतमोजणीमध्ये गैरव्यवहार झाल्याची मोहित कुमार यांची तक्रार योग्य असल्याचे सिद्ध झाले. फेरमतमोजणीचा हा निकाल न्यायालयाच्या रजिस्ट्रारने न्यायालयासमोर मांडला. तो निकाल न्यायालयाने स्वीकारला आणि मोहित कुमार यांना विजयी घोषित करण्याचे आदेश जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांना दिले.

न्यायालयाने नेमून दिलेल्या अधिकृत रजिस्ट्रारच्या समक्ष, सर्व संबंधित व्यक्तींच्या उपस्थितीत, व्हिडिओ चित्रीकरणासह सत्यातील निष्कर्ष पाहून हा निकाल रजिस्ट्रारने सर्व संबंधित पक्षांच्या समक्ष, व्हिडिओ चित्रणासह ही फेरमतमोजणी करण्यात आली असल्याने न्यायालयाचा निकाल अंतिम मानावा, अशी स्पष्ट सूचना न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिली.

या निकालानंतर कोणाच्या मनात काही शंका असल्यास ते निवडणूक लवादाकडे जाऊ शकतात. मात्र लवादाने कोणताही निकाल देताना फेरमतमोजणीचा निकाल अंतिम मानला पाहिजे, असे पुढे न्यायालयाने सांगितले. याचिकाकर्ते मोहित कुमार यांच्या वतीने वरिष्ठ वकील लीझ मॅथ्यू यांच्यासह परवीन कुमार, महेंद्र कुमार, दीपक तुशीर, अंकूर कुमार, रजनीश मान, गरिमा खेतल, निहारिका, मल्लिका अगरवाल, दिलीप कुमार, अलोक कुमार द्विवेदी, आशिष कुमार राय आणि रजनी रानी अशी वकिलांची फौजच उभी करण्यात आली होती. तर बचाव पक्षाच्या वतीने वरिष्ठ वकील गगन गुप्ता यांच्यासह करन कपूर, माणिक कपूर, सृष्टी सिंगला आणि श्रेया कपूर यांनी बाजू मांडली.

# गोविंदा पथकांवर यंदाही लाखोंच्या बक्षिसांची बरसात

पान ८ वरून

बदलापूरच्या शिरगाव येथील आपटेवाडी येथे दहीहंडी बांधण्यात येणार आहे. एकूण ३ लाख ३३ हजार ३३३ रुपयांची बक्षिसे इथे देण्यात येणार आहेत. उलवे येथील शिवसंघर्ष प्रतिष्ठानने यंदा ५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची बक्षिसे ठेवली असून, उलव्याच्या सेक्टर २० मधील रेडक्लिफ शाळेजवळ ही दहीहंडी बांधण्यात येणार आहे. कफ परेड येथे दहीहंडी साठी ३,३३,३३३ रुपयांची बक्षिसे आहेत. मुंबई, ठाणे, घाटकोपर, परळ, लालबाग, वाशी येथेही लाखोंच्या हंड्या लावण्यात येणार असून, त्या फोडण्यासाठी गोविंदा पथकांमध्ये चुरस होणार आहे.

# अमेरिकन विद्यापीठाची हिवरे बाजाराला भेट

अहिल्यानगर

**अमेरिकेतील** नेब्रास्का युनिव्हर्सिटी आणि आयआयटी भुवनेश्वर येथील शास्त्रज्ञांनी हिवरे बाजार पाणलोट क्षेत्राला भेट देऊन प्रकल्प कार्यपद्धतीचा अभ्यास केला. नेब्रास्का वॉटर सेंटर, नेब्रास्का युनिव्हर्सिटी, लिंकनचे संचालक डॉ. चित्तरंजन रे आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, भुवनेश्वरचे माजी अधिष्ठाता तसेच एस.ओ.ए. युनिव्हर्सिटीच्या सेंटर फॉर क्लायमेट स्मार्ट ग्रीकल्चरचे संचालक डॉ. रवींद्र कुमार पांडा यावेळी उपस्थित होते.

या भेटीदरम्यान मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक डॉ. सचिन कुमार नांदगुडे यांनी पाणलोट क्षेत्रातील कार्बन स्थिरीकरण प्रकल्पात वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाची सविस्तर माहिती दिली. हिवरे बाजारात सुरू असलेल्या क्लायमेट स्मार्ट पाणलोट क्षेत्रातील कार्बन स्थिरीकरण प्रकल्पाचे कौतुकही पाहुण्यांनी केले. या शिष्टमंडळाने पद्मश्री पोपटराव पवार यांची भेट घेऊन नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन, पाणलोट क्षेत्र विकास आणि ग्रामविकासातील हिवरे बाजारच्या क्रांतिकारक कार्यावर चर्चा केली.


**अभयलक्ष्मी को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.,**
मु.कार्या. : बी/१०७, सिद्धीविनायक को-ऑप. हौ.सो.लि., के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई -११.

**३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस**

(फक्त सभासदांकरिता)

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

उपरोक्त संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी सांय.४ वा. संस्थेचे अध्यक्ष श्री. आनंदराव ज्योतीबा सकपाळ यांच्या अध्यक्षतेखाली लक्ष्मी लोक कल्याण केंद्र, रसुल जीवा कंपाऊंड, के.के.मार्ग, सातरस्ता, मुंबई - ११. या ठिकाणी आयोजित केली आहे. तरी आपण वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

दि.: १४/८/२५
स्थळ: मुंबई.

श्री. कृष्णा शिवराम खंडागळे
(महाव्यवस्थापक)
कार्यकारी मंडळाच्या आदेशानुसार

अहवालाची प्रत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत आपल्या जवळच्या शाखेमधून घ्यावी.


पान १ वरून

झाले. पण पोलिसांनी कोणतीच ठोस कारवाई केली नाही. कुणावरही गुन्हा दाखल केला नाही. तेव्हा पोलीस कुठे होते? आम्ही शांततेने पोलिसांना निवेदन द्यायला आलो तर आमची धरपकड झाली. माझा हात मुरगळला, रक्त निघाले. गृहमंत्री विशिष्ट समाजासोबत उभे आहेत. हा धर्माचा नव्हे, आरोग्याचा विषय आहे. न्यायालयाचा आदेश असताना दादागिरी खपवून घेतली जाणार नाही. कायदा मोडणाऱ्यांविरोधात आम्ही उभे राहू आणि आवश्यक असल्यास लाखोंचे मोर्चे काढू.

रमाकांत बने म्हणाले की, आम्ही शांततेत न्यायालयाच्या निर्णयाच्या समर्थनार्थ निवेदन देण्यासाठी आलो होतो. मात्र पोलिसांनी आमच्यावर कारवाई केली. ६ ऑगस्टला जैन धर्मीयांनी आक्रमक आंदोलन करत ताडपत्री फाडली, शस्त्रे वापरली तरी त्यांच्यावर कारवाई झाली नाही. त्या दिवशी पोलिसांनी किती जणांना उचलले ते जाहीर करा. ज्यांनी शस्त्र आणली होती त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले का ते सांगा. त्यांच्यावर कारवाई नाही आणि

# मराठी आंदोलकांची धरपकड! जैनांना सूट
# मात्र कोर्टाचा निर्णय कायम! कबूतरांना खाणे नको

आम्ही नुसते बोललो तर आम्हाला पोलिसांनी उचलले. ते लाखांचा मोर्चा काढणार म्हणतात, आम्हीही ताकद दाखवू शकतो. मराठी भूमिपुत्रांनी न्यायासाठी आवाज उठवला तर कारवाई का? हा जातीय नव्हे, सामाजिक आणि आरोग्याचा प्रश्न आहे.

यापूर्वी शस्त्र उचलण्याची भाषा करणाऱ्या जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी आज घुमजाव करत म्हटले की आम्ही अहिंसा, सत्याग्रह, उपोषण या शस्त्रांचा वापर करणार असल्याचे म्हटले. कबुतरखान्यावरून सुरू झालेल्या वादात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हस्तक्षेप करावा.

राज ठाकरे यांच्याकडे बाळासाहेब ठाकरे यांची विचारधारा आहे. मराठी व मारवाडी यांच्यात निर्माण झालेला वाद मिटवण्यासाठी तेच सक्षम आहेत. ते पुढे म्हणाले की, आमची जन्मभूमी राजस्थान असली, तरी कर्मभूमी महाराष्ट्र आहे. आमच्या कारखान्यांत आणि दुकानांत मराठी लोक काम करतात, आम्हाला त्यांच्या भाषेचा आणि कष्टांचा सन्मान आहे.

३ ऑगस्टला आमचे गेटवेवर शांततापूर्ण आंदोलन झाले. ११ ऑगस्टला आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. पण त्याआधीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला कबुतरांना दाणे टाकण्याची परवानगी दिली. तरीही पालिकेने ताडपत्री काढली नाही. त्यामुळे सुमारे २० हजार कबुतरे मृत्यूमुखी पडली, म्हणून आंदोलन झाले. महिलांच्या हातात असलेले चाकू हे ताडपत्री आणि दोऱ्या कापण्यासाठी होते. आम्ही हिंदू आहोत, आम्ही शस्त्र मराठी माणसावर उचलत नाही. जैन समाज देशात सर्वाधिक कर भरणारा समाज आहे. गोशाळा, प्राणी रुग्णालये, जीवदया हे सर्व आमचे कार्य आहे. कुत्रे, मांजरांसाठीही रुग्णवाहिका आम्ही चालवतो.

मराठी एकीकरण समितीच्या आंदोलनावर मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मला त्यावर काहीही बोलायचे नाही अशी प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लोकांचे आरोग्य महत्त्वाचे आहे.

त्याचबरोबर काही विषय आस्थेचे असतात. त्यामुळे हे दोन्ही प्रश्न लक्षात घेऊन मार्ग काढू शकतो. ज्याठिकाणी वस्ती नाही तेथे आपण कबुतरांना खाद्य देण्याची व्यवस्था करू शकतो. हा वादाचा नाही तर सामाजिक समन्वयाचा विषय आहे. परंतु काही लोकांना यामध्ये महापालिका निवडणुकांची संभावना लक्षात येते आहे.

त्यामुळे एका समाजाविरुद्ध दुसरा समाज आणि एका भाषेविरुद्ध दुसरी भाषा असे भांडण लावण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण ते यशस्वी होणार नाही. कारण मुंबईची प्रकृती अशी नाही.


**NOTICE INVITING QUOTATION FROM REPUTED ARCHITECT/ LISCENCED SURVEYOR TO PROVIDE PROJECT FEASIBILITY REPORT FOR REDEVELOPMENT OF SOCIETY LAND UNDER RELEVANT PROVISIONS OF DCPR 2034.**

**SOCIETY NAME:**
YUWAN APARTMENTS CHSL, 413/414 MOUNT MARY ROAD, BANDRA WEST, MUMBAI 400050.

**PLOT DETAILS:**
CTS 592, 599, 623 IN VILLAGE BANDRA-B, H/W WARD. PLOT AREA IS 10,574.70 SQ MTR.Abutting 18M wide Mount Mary

**MINIMUM ELIGIBILITY CRITERIA:**
ARCHITECT SHALL have COMPLETED (with full O.C.) ATLEAST 3 PROJECTS OVER 10,000 SQ MTR EACH LAND AREA within MCGM limits AND HAVING ATLEAST 15 YEARS OF EXPERIENCE.

**CONSIDERATION:**
ALL SELECTION RIGHTS RESERVED WITH THE SOCIETY.

**QUOTATION DURATION:**
QUOTATIONS SHALL BE SUBMITTED TO SOCIETY OFFICE BY 25/08/2025 BEFORE 6:00 PM

**FOR ANY QUERIES PLEASE CONTACT HON. SECRETARY ON MAIL**
ID:yuwanapartments1971@gmail.com

**NOTE:** SOCIETY RESERVES THE RIGHT TO ACCEPT / REJECT ANY OR ALL QUOTATIONS.



**जाहिर नोटीस**

बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त एच/पश्चिम विभाग, मालमत्ता अधिकारी एच/पश्चिम, दुसरी हसनाबाद लेन, खार (प) मुंबई-४०००५२. या कार्यालयाच्या अखत्यारीतील खोली क्र. १३, तिसरा मजला, बिल्डिंग क्र. १६, ३२० म.न.पा वसाहत, शास्त्रीनगर, सांताक्रूझ (प), मुंबई - ४०००५४. ही सदनिका मनपाच्या मालकीची असून म.न.पा.चे मूळभाडेकरू, तेजस मनोज वीरा यांनी दिनांक १९ जुलै २०२२ रोजीच्या शपथपत्राद्वारे सदर खोलीचे भाडेतत्त्व अधिकार माझ्या नावे (मझर अब्बास सय्यद) हस्तांतरित केले आहेत. वरील खोलीचे भाडेतत्व अधिकार माझ्या नावे हस्तांतरित करण्याकरिता मान. सहा. आयुक्त एच /पश्चिम विभाग कार्यालयात ऑनलाईन प्रणालीद्वारे दि. २८ जुलै २०२२ क्रमांक HWBT22070076 अन्वये अर्ज सादर केला आहे. तरी सदरहू खोलीच्या भाडेतत्व हक्क हस्तांतराबाबत कोणत्याही व्यक्ती अथवा आर्थिक संस्था यांचे आक्षेप किंवा हरकती असल्यास ही जाहिर सूचना छापून आल्यानंतरच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत वर नमूद मुंबई महानगरपालिका कार्यालयात लेखी कळविण्यात यावे व त्या संदर्भातील योग्य ती कागदपत्रे सादर करावीत. या १५ दिवसांच्या कालावधी नंतर प्राप्त होणारी तक्रार/ हरकत अथवा दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

वकील - तफसीर फातिमा सय्यद
खोली क्रमांक २/१, इमारत क्रमांक २०, शास्त्रीनगर, लिंकिंग रोड, सांताक्रूझ पश्चिम, मुंबई - ४०००५४


# नितीश कटारा हत्याकांडातील दोषीची सुटका! आई नाराज

पान १ वरून

झाल्यानंतर नियमाप्रमाणे त्याची मुक्तता करण्यासाठी आढावा समितीकडे अर्ज करण्यात आला. समितीने त्याच्या सुटकेला नकार दिला. सुखदेवने या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने तांत्रिक बाबींवर बोट ठेवत त्याची मुक्तता करण्याचे आदेश दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशावर प्रतिक्रिया देताना नीलम कटारा यांनी असा दावा केला की, सुखदेव यादव याला जन्मठेपेची शिक्षा झाली होती. २० वर्षांची शिक्षा पूर्ण होईपर्यंत आढावा घ्यायचा नाही इतकेच म्हटले होते. आढावा समितीनेही त्याच्या मुक्ततेला विरोध केला होता. असे असताना सर्वोच्च न्यायालयाने त्याला मुक्त करण्याचे आदेश देणे दुर्दैवी आहे. त्याला २० वर्षांची शिक्षा झाली आणि ती त्याने पूर्ण केली असल्याने त्याला सुटकेच्या परवानगीसाठी आढावा बैठकीच्या मंजुरीची आवश्यकता नाही असे न्यायालयाने म्हटले.

# मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था सिंधुदुर्गात उबाठाचे आंदोलन

पान १ वरून

सोडले. वैभव नाईक यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि शिंदे गटाचे मंत्री दीपक केसरकर यांची जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन महामार्गाची कैफियत मांडली. या भेटीनंतर वैभव नाईक म्हणाले की, आम्ही आंदोलन करत असताना बावनकुळे यांनी स्वतः पुढाकार घेत आम्हाला चर्चेसाठी बोलावले. त्यांनी सौजन्य दाखवत या विषयावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी चर्चा केली. जिल्ह्यातील विविध महसूल विषयांवरही सविस्तर चर्चा झाली. येथील पालकमंत्र्यांना फक्त आरोप-प्रत्यारोप करण्यातच रस आहे. मात्र बावनकुळे यांनी तसे न करता आम्हाला बोलावून आमचे प्रश्न जाणून घेतले आणि संवाद साधला. त्यांच्या या भेटीमुळे वैभव नाईक भाजपात प्रवेश करणार याची पुन्हा चर्चा सुरू झाली.


**कामगारांसाठी जाहीर सुचना/नोटीस**

या जाहिरातीद्वारे कळविण्यात येते की, श्री. थॉमस राजन, संचालक, मे. हॅली पॅसिफिक प्रा. लि., सि. एस. नं. ४२६१, टी. पी. एस., नं. ४, माहिम, डिव्हीजन, प्लॉट नं. १०४२, सयानी रोड, १ ली खेडगल्ली, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५. सदर आस्थापना दिनांक ३१/०३/२०२५ रोजी मंदीत असल्यामुळे बंद झाली. या आस्थापनाच्या जागेचे क्षेत्रफळ ७१७.३१ चौ. मी. असून सह जिल्हा निबंधक, वर्ग-२, (अभिलेख) मुंबई जिल्हा या कार्यालयातील नोंदणीनुसार मिळकतीचे मालक आहोत आणि तिचा विद्यमान वापर बदलुन सदर मिळकत विकसित व विक्री करण्याचे आम्ही प्रस्तावित करीत आहोत. तरी देखिल मे. हॅली पॅसिफिक प्रा. लि., सि. एस. नं. ४२६१, टी. पी. एस., नं. ४, माहिम, डिव्हीजन, प्लॉट नं. १०४२, सयानी रोड, १ ली खेडगल्ली, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५. या आस्थापनेत पुर्वी काम केलेल्या सर्व कायम कामगार, कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची व त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देण्याबाबत, विवादाबाबत दावे/तक्रारी जागेचे व्यवस्थापक व विकासकाच्या विरुद्ध असल्यास त्याबाबतची लेखी तक्रार कागदपत्राच्या पुराव्यासहित कामगार उप आयुक्त मुंबई शहर यांचे कार्यालय, कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०० ०५१ यांच्याकडे जाहिर नोटीस/सुचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासुन १५ दिवसाच्या आत सादर करावी. या कालावधीनंतर दाखल केलेली तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, व त्यासंदर्भात आम्ही कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाही.

स्थळ-मुंबई
दिनांक-१४/०८/२०२५

सही-
मे. हॅली पॅसिफीक प्रा. लि.,
(संचालक)



**जावक क्रमांक :-** १३८२५-०१

**परिशिष्ट क्र. २**
**उपविधी क्र. ३५ अन्वये**

**नोटीस**

राणूशेठ एस. आर. ए. को. ऑप. हौ. सोसायटी लि. इमारत क्र. २ सदनिका क्र. ४०३, अण्णासाहेब पाटील मार्ग, खेडगल्ली एक्स लेन, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५. या संस्थेचे मयत सभासदाच्या वारसदाराने संस्थेकडे वारस नोंदणीबाबत अर्ज दाखल केलेला आहे. संस्था या जाहिरातीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदांचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सभासदाच्या वारसदार यांच्याकडून हक्क, मागण्या हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या व हरकतींच्या संपूर्ण आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क, मागण्या किंवा हरकत संस्थेकडे सादर झाल्या नाहीत तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध याच्या हस्तांतरणबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क / मागण्या / हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदणी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात अध्यक्ष/सचिव यांच्याकडे दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

| मयत सभासदाचे नाव - | सदनिका क्र. | इमारत क्र. | परिशिष्ट क्र. | वारसदाराचे नाव. |
|---|---|---|---|---|
| मनराज रामनंदन यादव- | ४०३ | २ | ६५ | उमावती प्रभुनाथ पाण्डेय |

ठिकाण :- मुंबई.
दिनांक :- १३/०८/२०२५

सही/-
श्री. भास्कर म. सब्बानी
अध्यक्ष
राणूशेठ एस. आर. ए. को. ऑप. हौ. सोसा. लि.

# नवाकाळ

• पुणे | गुरुवार १४ ऑगस्ट, २०२५ • पान -८




करिरोडचा राजा- मुंबई



मेट्रोचा राजा - मुंबई

## कुस्तीपटू सुशील कुमारला शरण येण्याचे कोर्टाचे आदेश

■ नवी दिल्ली

**कुस्तीपटू** सागर धनखड याच्या हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी ऑलिम्पिक पदक विजेता कुस्तीपटू सुशील कुमार याचा जामीन सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला असून, त्याला एका आठवड्यात पोलिसांना शरण येण्याचे आदेश दिले आहेत. सुशील कुमार याला दिल्ली उच्च न्यायालयाने जामीन दिला होता. मात्र मयत सागर धनखडच्या वडिलांनी त्याच्या जामिनाला आक्षेप घेतला होता. दिल्ली उच्च न्यायालयाने दिलेला तो आदेशच चुकीचा आहे, असा दावा सागर धनखड याच्या वकिलाने केला होता. सागर धनखडच्या वडिलांचे वकील जोशिनी तुली यांनी सांगितले की, सुशील कुमार याला दिलेला जामीन सर्वोच्च न्यायालयाने आज रद्द केला आहे. कारण दिल्ली उच्च न्यायालयाचा तो आदेश चुकीचा होता,असा दावा आम्ही केला होता.

## भारतात लवकरच पहिली हायड्रोजन ट्रेन धावणार

■ नवी दिल्ली

**भारताची** पहिली हायड्रोजन ट्रेन लवकरच प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. सध्या चेन्नई



येथील इंटिग्रल कोच फॅक्टरीत (आयसीएफ) तिचे काम अंतिम टप्प्यात आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सोशल मीडियावर या ट्रेनचा व्हिडिओ शेअर करत तिची पहिली झलक दाखवली.

नमो ग्रीन रेल नावाची ही १२०० हॉर्सपॉवर क्षमतेची ट्रेन ताशी ११० किमी वेगाने धावणार असून, एकूण १० डब्ब्यांसह पुढे व मागे इंजिन असणार आहे. निळ्या रंगातील विशेष डिझाईनमुळे ती वेगळीच आकर्षक दिसते. या प्रकल्पाअंतर्गत १६०० हॉर्सपॉवरच्या दोन डबल इंजिनांचे रुपांतर १२०० हॉर्सपॉवरमध्ये करण्यात आले आहे. देशातील हायड्रोजन इंधनावर धावणारी ही पहिली ट्रेन हरयाणातील जींद-सोनीपत मार्गावर सुरू होणार आहे. प्रवाशांच्या क्षमतेएवढे वजन ठेवून तिची चाचणी केली जाणार आहे.

२०२३ साली राज्यसभेत रेल्वेमंत्र्यांनी हायड्रोजन ट्रेन सुरू करण्याची घोषणा केली होती. आता वंदे भारतनंतर मेक इन इंडियाचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत, स्वच्छ इंधन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हायड्रोजनवर धावणारी ही हायस्पीड ट्रेन लवकरच ट्रॅकवर येणार आहे.

## तहव्वूर राणाच्या कोठडीला ८ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

■ नवी दिल्ली

२६-११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार तहव्वूर राणा याच्या न्यायालयीन कोठडीची मुदत पतियाळा हाऊस कोर्टाने आज ८ सप्टेंबरपर्यंत वाढवली. व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून आज राणाच्या अर्जावर सुनावणी झाली.

तहव्वूर राणाविरूध्द सुरू असलेल्या खटल्याची पुढील सुनावणी ८ सप्टेंबर रोजी होणार आहे. तोपर्यंतच्या काळात न्यायालय खटल्याशी संबंधित सर्व कागदपत्रांची छाननी करणार आहे.

पाकिस्तानी वंशाचा कॅनेडीयन नागरिक असलेल्या तहव्वूर राणाला गुन्हेगार प्रत्यार्पणाच्या माध्यमातून अमेरिकेतून भारतात आणण्यात आले आहे.

## चिपळुणमध्ये पहिल्यांदाच आढळला 'आफ्रिकन बगळा'

■ चिपळूण

**कोकणातील** निसर्गरम्य अशा चिपळूण तालुक्यातील पाणथळ परिसरात नुकताच दुर्मीळ 'आफ्रिकन बगळा' पक्षी आढळून आला आहे. पक्षी निरीक्षक डॉ. श्रीधर जोशी यांनी 'ब्लॅक हेरॉन' नावाच्या या अत्यंत दुर्मीळ आणि भारतात आजवर न दिसलेल्या दोन पक्ष्यांना आपल्या कॅमेऱ्यात टिपले आहे.

हा पक्षी आफ्रिकेतून आला असून, त्याचे स्थलांतर पक्षी अभ्यासकांच्या दृष्टीने ऐतिहासिक मानले जात आहे. डॉ. जोशी यांना सकाळच्या एका पाणथळ जागी दोन काळे बगळे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने मासे पकडताना दिसले. त्यांनी त्वरित कॅमेऱ्यात हे क्षण टिपले आणि



घरी आल्यावर त्याचा सखोल अभ्यास केला. त्यावेळी जगात ही अनोखी मासे पकडण्याची शैली केवळ ब्लॅक हेरॉन या आफ्रिकन पक्षातच दिसून येते असे आढळले. हा पक्षी आपले पंख अर्धवर्तुळात पसरण्याची ही अनोखी युक्ती करून माशांना सावलीखाली आकर्षित करतो आणि त्यांना सहज पकडतो. सुरुवातीला हा रातबगळा असल्याचा अंदाज काही निरीक्षकांनी व्यक्त केला. मात्र लांब पाय, संपूर्ण काळे शरीर आणि 'कॅनोपी फिडींग'ची खास शैली या वैशिष्ट्यांवरून सर्वांचे एकमत झाले की, तो पक्षी म्हणजेच ब्लॅक हेरॉनच आहे. ही माहिती व छायाचित्रे डॉ. जोशी यांनी 'इंडियन बर्ड जर्नल'कडे पाठवली असून, भारतात या पक्ष्याची ही पहिलीच अधिकृत नोंद असल्याचे प्राथमिक संकेत आहेत. ब्लॅक हेरॉन हा मुख्यतः पश्चिम आणि दक्षिण आफ्रिकेत आढळणारा निवासी पक्षी आहे. सेनेगल, सुडान, केनिया, तंजानिया, मोजांबिक आणि मॅडगास्कर हे त्याचे नैसर्गिक अधिवास आहेत. युरोपातही ग्रीस, इटली, डब्लिन याठिकाणी काही अपवादात्मक नोंदी आहेत. मात्र भारतात आजवर या पक्ष्याचा एकही ठोस पुरावा मिळाला नव्हता. हा पक्षी स्थलांतर करत नाही. केवळ अन्नपाण्याची कमतरता असल्यास तो परिसर बदलतो.

## अनधिकृत बांधकामावरील ७९९ कोटी दंड शिंदेंकडून माफ

■ ठाणे

**महाराष्ट्राचे** उपमुख्यमंत्री व शहरविकास खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातील अनधिकृत बांधकामांवर लावलेला तब्बल ७९९ कोटी रुपयांचा दंड माफ केला आहे. मालमत्ता कर वेळेत न भरल्याने हा दंड आकारण्यात आला होता.

ठाण्यातील विविध मालमत्ताधारकांनी थकवलेल्या या दंडामुळे ठाणे महानगरपालिकेच्या महसुलात मोठी घट होणार आहे. शहर विकास मंत्रालयाने महापालिकेला मालमत्तांचे सर्वेक्षण करायला सांगितले असून, त्यातून कराद्वारे महसूल वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. दंडाची रक्कम माफ केल्यामुळे एकूण मालमत्ता कराची रक्कम १४५ कोटी रुपयेच होणार आहे. ठाणे महापालिकेने म्हटले की, दंड माफ केल्यामुळे किमान ही रक्कम तरी वसूल होण्याची शक्यता आहे. अवैध बांधकामावरील दंड माफ केला असला तरी ही बांधकामे नियमित केली असा त्याचा अर्थ होणार नाही. त्याचबरोबर यामुळे ठाणे पालिकेच्या नुकसानीची भरपाई केली जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. पालिकेचा दंड माफ करण्याचा अध्यादेश या आठवड्याच्या सुरुवातीलाच काढण्यात आला आहे.

## गोविंदा पथकांवर यंदाही लाखोंच्या बक्षिसांची बरसात

■ मुंबई

**ढाकुमाकुम** ढाकुमाकुम करत यंदा जेव्हा शहरातील गोविंदा पथके विविध ठिकाणच्या दहीहंड्या फोडायला बाहेर पडतील तेव्हा त्यांच्यावर दह्यादुधाबरोबर लाखो रुपयांच्या बक्षिसांचीही बरसात होणार आहे. शहरातील व शहराबाहेरील दहीहंडींना यंदाही लाखो रुपयांची बक्षिसे लावण्यात आली आहेत.

गोकुळाष्टमीचा दुसरा दिवस हा दहीहंडी फोडण्याचा असतो. यावर्षी मुंबई, ठाणे, नवी मुंबईमधील अनेक दहीहंड्यांनी या गोविंदा पथकांसाठी रोख बक्षिसांबरोबरच इतरही अनेक आकर्षक पारितोषिके ठेवली आहेत. मिरा रोड येथील आरंभ युवा फाऊंडेशनच्या वतीने एकूण ७ लाख ७७ हजार ७७७ रुपयांची रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत. बदलापूर येथे सर्वाधिक थर लावून दहीहंडी फोडणाऱ्या मंडळाला २१ हजार रुपयांचे पारितोषिक असून, एक आकर्षक चषकही देण्यात येणार आहे. प्रत्येक थराला खास बक्षिसही देण्यात येणार आहे.

» पान ७ वर



देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुंबईतील मंत्रालयाची इमारत तिरंग्याच्या रंगातील रोषणाईने उजळून निघाली आहे.(छाया - दीपक साळवी)



## बेटिंग ॲप प्रकरणात क्रिकेटर सुरेश रैनाची ईडीकडून चौकशी

■ नवी दिल्ली

**माजी** क्रिकेटर सुरेश रैनाला बेटिंग ॲप प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) समन्स बजावले असून, त्याची आज चौकशी करण्यात आली. दिल्लीत ईडी कार्यालयात त्यांचा जबाब नोंदवला गेला. उद्या देखील चौकशीसाठी त्यांना ईडी कार्यालयात हजर राहावे लागणार आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये वन एक्स बेट या बेटिंग ॲपने रैनाला ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त केले होते. कंपनीने त्यावेळी जाहीर केले होते की, रैनासोबतची भागीदारी चाहत्यांना बेटिंग करण्यास प्रोत्साहित करेल. अलीकडे ईडीने बेटिंग आणि त्याला प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई सुरू केली आहे. प्रसिद्ध कलाकार आणि व्यक्तींकडून केल्या जाणाऱ्या बेटिंग ॲपच्या जाहिरातींमुळे ईडीने कठोर कारवाई देखील केली. परिमॅच या बेटिंग ॲपशी संबंधित रॅकेटचा पर्दाफाश करण्यासाठी ईडीने मुंबई, दिल्ली-एनसीआर, हैदराबाद, जयपूर, मदुराई आणि सूरतसह १५ ठिकाणी छापे टाकले होते. पूर्वी बंदी घालण्यात आलेल्या बेटिंग वेबसाइट्स आणि ॲपची जाहिरात केल्या प्रकरणात अनेक सेलिब्रिटींना नोटीस देण्यात आली होती, ज्यात सुरेश रैनाचे नावही होते. त्यामुळे आता त्यांच्या अडचणींमध्ये भर पडली आहे.

## गिरगावात आलिशान घर असूनही धनंजय मुंडे शासकीय बंगल्यात

**दीड वर्षांपासून बंद आहे घर**

■ मुंबई

**राष्ट्रवादी** अजित पवार गटाचे नेते आमदार धनंजय मुंडे यांनी पाच महिन्यांपूर्वी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मुंबईत स्वतःचे घर नसल्याचे कारण देऊन त्यांनी अद्याप मुंबईतील शासकीय निवासस्थान सातपुडा बंगला रिकामा केलेला नाही. पण गेल्या विधानसभा निवडणुकीत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार त्यांच्याकडे गिरगावात १६.५० कोटींचे आलिशान घर आहे. विशेष म्हणजे घर गेल्या दीड वर्षांपासून बंद आहे आणि वापरात नाही.

धनंजय मुंडे यांनी विधानसभा निवडणुकीत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, गिरगाव



चौपाटीजवळील एन. एस. पाटकर मार्गावरील २२ मजली 'वीरभवन' इमारतीतील नवव्या मजल्यावरील ९०२ क्रमांकाची ही सदनिका डिसेंबर २०२३ मध्ये धनंजय मुंडे आणि त्यांच्या पत्नी राजश्री मुंडे यांच्या संयुक्त नावाने खरेदी करण्यात आली होती. या खरेदीसाठी १६ कोटी ५० लाख रुपये मोजले गेले, ज्यापैकी १० कोटी रुपये धनंजय मुंडे यांनी खर्च केले आहेत. मंत्रिपद गेल्यापासून पाच महिने उलटले तरी 'सातपुडा' बंगल्यातून बाहेर न पडल्याने अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना अद्याप ते सरकारी निवासस्थान मिळालेले नाही. ४,६६७ चौरस फुटांच्या या बंगल्यासंदर्भात नियमानुसार, मंत्रिपद गमावल्यानंतर १५ दिवसांत बंगला रिकामा न केल्यास प्रति चौरस फूट २०० रुपये दंड आकारला जातो.

## मावळे वरण-भात खाऊन लढले का? मांसविक्री बंदीवरून राऊतांचा टोला

■ मुंबई

**छत्रपती** शिवाजी महाराजांचे शूर मावळे हिंदवी स्वराज्यासाठी छातीचा कोट करून लढले. ते काय वरण-भात आणि तूप खाऊन लढले का, असा टोला शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी १५ ऑगस्टनिमित्त मांस-मच्छी विक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे समर्थन करणाऱ्यांना लगावला.

१५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त मांस-मच्छी विक्रीवर बंदी घालणे हा मूर्खपणा आहे. हा दिवस शौर्याचा दिवस आहे. मोठा लढा देऊन, शेकडो क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन स्वातंत्र्य मिळवले आहे. ते काही मोदी-शहांमुळे मिळालेले नाही. सध्या जो शाकाहारी-मांसाहारीचा वाद चालू आहे तो मर्द मराठ्यांच्या महाराष्ट्राला शोभणारा नाही. शिवरायांचे मावळे वरण-भात खाऊन लढले नाहीत. पेशवेदेखील मांसाहारी होते. आता जे शाकाहारीची बाजू हिरीरीने मांडत आहेत, त्यांचा देशाच्या स्वातंत्र्यामध्ये काडीचेही योगदान नाही, असे राऊत म्हणाले.

गुवाहाटीतील बंडावरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर राऊत यांनी पुन्हा एकदा घणाघाती टीका केली. कामाख्या देवीसमोर रेडे कापून सत्तेवर आलेल्यांना शाकाहारीवर बोलण्याचा अधिकार नाही, असे राऊत म्हणाले.

## काँग्रेसचा कांदा प्रश्नावर नाफेड कार्यालयावर मोर्चा

■ नाशिक

**कांदा** उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून नाशिकमध्ये नाफेड कार्यालयाबाहेर आज काँग्रेसतर्फे मोर्चा काढण्यात आला. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा पार पडला. तर काल या विषयावर संसदेच्या आवारात खासदारांनी आवाज उठवला होता. कांद्याला किमान ३ हजार रुपये प्रति क्विंटल हमीभाव मिळावा, नाफेडच्या खरेदीतील भ्रष्टाचार आणि दलालीची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. कांदा दर दिवसेंदिवस घसरत असल्याने शेतकरी संतप्त असून, त्यांच्या पुढे गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. कांदा निर्यातबंदीचा निर्णय मागे घ्यावा आणि उत्पादकांना तत्काळ मदत करावी, या मागणीसाठी महाविकास आघाडीचे खासदार सातत्याने पाठपुरावा करत आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारमण, पणन मंत्री पियुष गोयल आदी मंत्र्यांना भेटून मागण्या मांडण्यात आल्या.

## गोपाळकाला, अनंत चतुर्दशीला शाळांना सुट्टी देण्याची मागणी

**मुख्याध्यापक संघटनेचे शिक्षणमंत्र्यांना निवेदन**

■ मुंबई

**यंदा** पहिल्यांदाच राज्य सरकारने गोपाळकाला आणि अनंत चतुर्दशीची सुट्टी रद्द केली आहे. मात्र यामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक संताप व्यक्त करीत आहेत. सरकारने पूर्वीप्रमाणेच यंदाही गोपाळकाला, अनंत चतुर्दशीची सुट्टी कायम ठेवावी, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात मुंबई मुख्याध्यापक संघटनेने शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना निवेदनही देण्यात आले आहे.

मुंबई मुख्याध्यापक संघटनेचे उत्तर विभाग अध्यक्ष व भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य अनिल बोरणारे यांनी



सांगितले की, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. तसेच अनंत चतुर्दशीच्या दिवशी दहा दिवसांच्या गणपतीचे विसर्जन केले जाते. मुंबईत या दोन्ही सणांच्या दिवशी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी असते. त्यामुळे वाहतुकीमध्ये बदल करण्यात येतात. तसेच अनेक ठिकाणचे रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात येतात. रस्ते बंद केल्याने वाहतूक कोंडी होते. त्यामुळे दरवर्षी या दोन्ही दिवशी सुट्टी दिली जात होती. परंतु यंदा अचानक या दोन्ही सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे शाळेत जाताना विद्यार्थी व शिक्षकांना अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. गर्दीमधून वाट काढत विद्यार्थी व शिक्षकांना शाळेत जावे लागणार आहे. तसेच अनेक विद्यार्थी या दिवशी अनुपस्थित राहण्याची शक्यता अधिक आहे.